देवना आत्माघाई, भूत काढी ऱ्हायनु तर देवनं राज्य तुमनावर येल शे. 29 तसच
पहीलवान माणुसले अगोदर बांधाशिवाय त्याना घरमा घुशीसन त्याना वस्तु लुटीसन
कोणले नेता ई का? त्याले बांध तरच तो त्यानं घर लुटू शकस. 30 जो मनासंगे नही
तो मनाविरूध्द शे, अनी जो मनाबरोबर गोया करस नही तर तो उधळी टाकस. 31
यामूये मी तूमले सांगस, की माणुसना प्रत्येक पाप अनी निंदानी क्षमा व्हई. पण जो
कोणी पवित्र आत्मानी निंदा करी त्यानी क्षमा व्हवाव नही. 32 अनी जो कोणी
मनुष्यना पोऱ्याविरूध्द काही बोली तर त्याना अपराधनी क्षमा व्हई जाई, पण जो
कोणी पवित्र आत्माना विरोधमा बोली त्याले त्याना अपराधसनी क्षमा ह्या युगमा
बी नही. अनी येनारा युगमा बी व्हवाव नही. **(aiōn g165)** 33 यामुये झाड बी
चांगलं अनी त्यानं फळ बी चांगलं शे असा म्हणा; नहीतर झाड वाईट शे अनी
त्याना फळ बी वाईट; कारण झाड आपले फळवरतीन वळखाई जास. 34 अहो
सापना पिल्लासवन, तुम्हीन वाईट ऱ्हाईसन तुमले चांगल्या गोष्टी कशा बोलता
येतीन? कारण जे मनमा भरेल शे तेच तोंडमाईन निंघी. 35 चांगला माणुस आपला
भांडामाईन चांगल्या गोष्टी काढस, अनी वाईट माणुस आपले भांडामाईन वाईट
गोष्टी काढस. 36 मी तुमले सांगस की, ज्या बी व्यर्थ गोष्टी माणुस सांगी न्यायना
दिनले त्याले त्याना हिशोब देनाच पडी. 37 कारण आपला बोलनावर तु निर्दोष
ठरशी अनी आपलाच बोलनावर तु दोषी ठरशी. 38 तवय शास्त्री अनं परूशी
यासनापाईन काहीजण त्याले बोलनात, गुरजी, तुमना हातघाई काही चिन्ह दखानी
आमनी ईच्छा शे. 39 पण त्यानी त्यासले उत्तर दिधं, हाई दुष्ट अनी व्यभिचारी
पिढी चिन्ह मांगस, पण योना संदेष्टाना चिन्हशिवाय तिले दुसरं कोणतच चिन्ह

देवामा येवाव नही. **40** कारण जस योना तीन दिन अनं तीन रात मासाना पोटमा
व्हता, तसाच मनुष्यना पोऱ्या बी तीन दिन तीन रात पृथ्वीना पोटमा ऱ्हाई. **41**
न्यायना दिनले निनवेना लोके हाई पिढीना लोकससंगे उभा ऱ्हाईसन हिले दोषी
ठरावतीन, कारण त्यासनी योनाना संदेश ऐकीसन पश्चाताप करा; अनी दखा, आठे
जो शे तो योनापेक्षा श्रेष्ठ शे. **42** न्यायना दिनले दक्षिणकडनी राणी, हाई पिढीना
लोकेसंगे उभी ऱ्हाईन हिले दोषी ठराई, कारण ती शलमोन राजानं ज्ञान ऐकाकरता
पृथ्वीना सीमापाईन वनी; अनी दखा, शलमोनपेक्षा श्रेष्ठ आठे शे. **43** जवय दुष्ट
आत्मा कोणा माणुस माईन निंघस, तवय तो आराम कराकरता ओसाड जागामा
भटकत फिरस, पण त्याले जागा मिळस नही, **44** तवय तो सांगस, ज्या घरमाईन
मी येल व्हतु त्यामा परत जासु; अनी जवय तो तठे वापस जास, तवय त्याले
ते घर रिकामं साफसफाई करेल, सजाडेल अस दखास. **45** मंग तो जाईसन
आपलापेक्षा दुष्ट, असा दुसरा सात आत्मा आपलासंगे लई येस, अनी त्या मजार
जाईन तठे ऱ्हातस; मंग त्या माणुसनी शेवटनी अवस्था पहिलापेक्षा जास्त वाईट
व्हस; तसच हाई पिढीनं बी व्हई. **46** मंग येशु लोकसनी गर्दीसंगे बोली ऱ्हाईंता,
दखा, त्यानी माय अनं त्याना भाऊ त्यानासंगे बोलाकरता बाहेर उभा ऱ्हायेल
व्हतात. **47** तवय कोणी तरी येशुले सांगं, दख, तुनी माय अनं तुना भाऊ तुनासंगे
बोलाकरता बाहेर उभा ऱ्हायेल शेतस. **48** पण येशुनी त्या सांगणाराले उत्तर दिधं,
कोण मनी माय अनं कोण मना भाऊ? **49** अनी येशु आपला शिष्यसकडे हात
दखाडीन बोलना, "दखा, मनी माय अनं मना भाऊ! **50** कारण जो कोणी मना
स्वर्गना बापना ईच्छाप्रमाणे करस तोच मना भाऊ, बहिण, अनं माय शे."

**13** त्या दिन येशु घरमाईन निंघीसन समुद्र किनारले जाईन बसना. **2** तवय
लोकेसनी ईतली मोठी गर्दी त्यानाजोडे जमनी; म्हणीन तो नावमा जाईन बसना अनं
सर्वा लोके किनारवर उभा राहिनात. **3** मंग त्यानी त्यासले दृष्टांत दिसन बऱ्याच
गोष्टी सांगात तवय तो बोलना, "दखा, एक पेरणारा पेरणी कराले निंघना." **4** अनी
तो पेरी राहिंता तवय काही बीया वाटवर पडनात अनं पक्षीसनी ईसन ते खाई टाकं.
**5** काही खडकाळ जमीनवर पडनात, तठे त्यासले पुरेशी जास्त माती मिळनी
नही, अनी माती जास्त खोलपावत नव्हती म्हणीन त्या लवकर उगनात. **6** अनी
जवय सुर्य वर निंघना तवय त्यासले उन लागनं अनं त्या लगेच वाळाई गयात
कारण त्यासले मुयाच नव्हतात. **7** काही काटेरी झुडपसमा पडनात; पण काटासना

झुडपासनी वाढीसन त्यासनी वाढले दाबी टाकं. **8** काही बीया चांगली जमीनवर
पडनात, मंग त्यासनं कोठे शंभरपट, कोठे साठपट तर कोठे तीसपट, अस पीक
वनं. **9** अनी येशु त्यासले बोलना, ज्यासले कान शेतस त्या ऐकोत. **10** मंग
शिष्यसनी जोडे जाईसन त्याले ईचारं, तु त्यासनासंगे दृष्टांत दिसन का बरं बोलस?
**11** येशुनी त्यासले उत्तर दिधं, "स्वर्गना राज्यना रहस्य ओळखाना दान तुमले
देयल शे, पण त्यासले देयल नही." **12** कारण ज्यानाजोडे शे त्याले अजुन भेटी
अनं त्याले भरपुर व्हई, पण ज्यानाजोडे काहीच नही त्यानाकडे त्यानं जे काही
व्हई ते पण त्यानाकडतीन काढी लेतीन. **13** यामुये मी त्यासनासंगे दृष्टांत दिसन
बोलस; कारण त्यासले दखाले मिळस, पण दखतस नही, ऐकाले मिळस पण
ऐकतस नही, अनं समजी बी लेतस नही. **14** यशयाना संदेश त्यासना विषयी
पुर्ण व्हई ऱ्हाईना शे; तो असा की, तुम्हीन ऐकशात खरं, पण तुमले समजावुच
नही, अनं दखशात खरं, पण तुमले दिसावुच नही; **15** कारण ह्या लोकसना मन
कठीण व्हई जायेल शे, त्या बधीर कानघाई ऐकतस, अनी त्यासनी आपला डोया
झाकी लियेल शेतस; यानाकरता की, त्यासनी डोयासघाई दखाले नको, कानसघाई
ऐकाले नको, मनमातीन समजाले नको, त्यासनी वळाले नको, अनी मी त्यासले
बरा कराले नको. **16** पण धन्य शेतस, तुमना डोया, कारण त्या दखी ऱ्हाईनात;
अनी धन्य शेतस, तुमना कान कारण त्या ऐकी ऱ्हाईनात. **17** मी तुमले खरंखरं
सांगस की, तुम्हीन ज्या दखतस तेच दखाकरता बराच संदेष्टा अनं धार्मिकजण
उत्साही व्हतात, तरी त्यासले दखाले मिळनं नही; अनी तुम्हीन ज्या ऐकतस
तेच ऐकासाठे त्या उत्साही व्हतात, तरी त्यासले ऐकाले मिळनं नही. **18** आता
पेरणाराना दृष्टांत ऐकी ल्या. **19** कोणी राज्यनं वचन ऐकस पण ते त्याले समजस
नही; तवय तो दुष्ट ईसन त्याना मनमधला पेरेल वचन काढी लेस; वाटवर पेरेल तो
हाऊ शे. **20** खडकाळ जमीनवर पेरेल तो हाऊ शे की, वचन ऐकस, अनं तवळच
आनंद करस; **21** पण त्यासले मुया रास नही त्यामुये त्या थोडाच काळ टिकाव
धरतस; अनी वचनमुये संकट वना किंवा छळ व्हयना म्हणजेच तो अडखळाले
लागस. **22** काटेरी झुडपसमा पेरेल तो हाऊ शे की, वचन ऐकस; पण संसारनी
चिंता मोह या त्यानी वचननी वाढले दाबी टाकस, अनी तो निष्फळ व्हस. **(aiōn
g165)** **23** चांगली जमीनवर पेरेल या शेतस की, त्या वचन ऐकीन समजतस; तर
त्या फळ देतस; कोणी शंभरपट, कोणी साठपट, कोणी तीसपट, असा फळ देतस.

24 त्यानी त्यासले दुसरा दृष्टांत दिधा की, स्वर्गनं राज्य त्या माणुसना मायक शे,
ज्यानी आपला शेतमा चांगलं बी पेरं. 25 लोके झोपमा व्हतात तवयच त्याना वैरी
ईसन गहुमा निदण पेरीसन गया; 26 पण जवय शेतमा पिकले पानटा फुटीन अनं
कणीसमा दाणा वनात तवय निदण बी दखायनात. 27 तवय घरमालकना नोकरसनी
ईसन त्याले सांगं, महाराज, आपन आपला शेतमा चांगलं बी पैरा ना? मंग त्यामा
निदाण कोठेन वनं? 28 तवय मालक त्यासले बोलना, हाई काम कोणी वैरीनं शे.
नोकरसनी त्याले सांगं, आम्हीन जाईसन त्यासले गोया करूत अशी तुमनी ईच्छा शे
का? 29 तो त्यासले बोलना, नहीं, तुम्हीन निदाणले गोया करशात त्यानाबरोबर
कदाचित गहुले पण उपटी टाकशात 30 कापणीनी येळपावत दोन्हीसले बराबर
वाढू द्या, मंग कापणीना येळले मी मजुरसले सांगसू की, पहिले निदाण गोया करा,
अनं जाळाकरता त्याना पेंढ्या बांधा; अनी गहु मना कोठारसमा साठाडा. 31 येशुनी
त्यासले अजुन एक उदाहरण दिसन सांगं, की, स्वर्गनं राज्य मोहरीना दानासारखं
शे; ते कोणी एक माणुसनी लिसन आपला वावरमा जाईन लाई दिधं; 32 तो तर सर्वा
दानासमा बारीक शे, तरी तो वाढावर पालाभाज्याच पेक्षा मोठा व्हईन त्याना असं
झाड व्हस की, आकाशमधला पक्षी ईसन त्याना फांघासमा घरटा बांधीसन राहतस.
33 त्यानी त्यासले अजुन एक दृष्टांत सांगा, की, स्वर्गना राज्य खमीरना सारखं
शे; ते एक बाईनी लिसन तीन माप पिठमा लपाईन ठेवं, म्हणीन ते खमीर शेवट
सर्व फुगी गयं. 34 या सर्वा गोष्टी येशुनी दृष्टांत दिसन लोकसनी गर्दीले सांग्यात;
अनी उदाहरणशिवाय तो त्यासनासंगे काहीच बोलना नहीं; 35 हाई असाकरता
की, संदेष्टासनाद्वारा जे सांगामा येल व्हतं ते पुर्ण व्हावं; ते असं की, मी मनं तोंड
उघाडीसन उदाहरण दिसु; जगना सुरवातपाईन जे गुप्त ते मी प्रकट करसु. 36 नंतर
येशु लोकसनी गर्दीले निरोप दिसन घरमा गया. अनी त्याना शिष्य त्यानाकडे
ईसन बोलनात, वावरमधला निदणना उदाहरणना आमले फोड करीसन सांगा.
37 त्यानी उत्तर दिधं की, चांगलं बी पेरणारा हाऊ मनुष्यना पोऱ्या शे; 38 शेत
हाई जग शे; चांगलं बी हाई राज्याना पोऱ्या शेतस; निदण हाई त्या दुष्टना पोऱ्या
शेतस; 39 ते पेरणारा वैरी हाऊ सैतान शे; कापणी हाई या काळनी समाप्ती शे;
अनी कापणी करनारा या देवदूत शेतस. (aiōn g165) 40 यामुये जश निदाण गोया
करीसन अग्नीमा जाळतस, तसच काळना समाप्तीना येळले व्हई. (aiōn g165) 41
मनुष्यना पोऱ्या आपला देवदूतसले धाडी, अनी त्या सर्वा अडखळा आणनारासले

अनं अधर्म करनारासले त्याना राज्यमाईन गोया करतीन. 42 अनं त्यासले नरक
अग्नीना भट्टीमा टाकतीन; तठे त्यासनं रडानं अनं दात खाणं राही. 43 तवय
"धार्मीकजण आपला बापना राज्यमा सूर्याना मायक 'चमकतीन' ज्याले कान शे
तो ऐको." 44 स्वर्गनं राज्य शेतमा लपाईन ठेयल धनसारखं शे; ते एखादा माणुसले
सापडावर त्यानी ते लपाईन ठेवं, अनी आनंद व्हवामुये त्यानी जाईसन आपला सर्व
काही ईकी टाकं, अनी मंग ते शेत ईकत लिधं. 45 अजुन स्वर्गनं राज्य चांगला
मोतीना शोध करनारा एखादा व्यापारीना सारखं शे; 46 त्याले एक अति मोलवान
मोती आढळना तवय जाईसन त्यानी आपलं सर्वा काही ईकी टाकं अनी ते ईकत
लिधं. 47 अजुन स्वर्गनं राज्य समुद्रमा टाकेल जाळानामायक शे; ज्यामा सर्वा
प्रकारना जीव एकत्र सापडतस. 48 ते भरावर माणसंसनी काठवर ओढी आणं अनी
त्यासनी बशीसन ज्या चांगला त्या भांडामा गोया करात, अनं वाईट त्या फेकी
दिधात. 49 तसच हाई युगना समाप्तीमा व्हई; देवदूत ईसन धार्मीकसपाईन दुष्टासले
वेगळा करतीन; (aiōn g165) 50 अनी त्यासले अग्नीना भट्टीमा टाकतीन, तठे
रडानं अनं दातखाणं राही. 51 तुमले या गोष्टी समजन्यात का? त्या त्याले बोलनात,
हा. 52 तवय त्यानी त्यासले सांगं, जो प्रत्येक शास्त्री स्वर्गना राज्यना शिष्य व्हयेल
शे तो आपला भांडामाईन नवा जुना पदार्थ काढनारा माणुसना मायक शे. 53 मंग
असं व्हयनं की, या दृष्टांत समाप्त करावर येशु तठेन निंघी गया; 54 अनी आपला
गाववर येवावर त्यानी त्यासना सभास्थानमा त्यासले असं शिकाडं की, त्या थक्क
व्हईसन बोलनात की, हाई ज्ञान अनं हाई सामर्थ्य याले कोठेन प्रकट व्हयनं? 55
काय हाऊ सुतारना पोऱ्या नही शे का? यानी मायले मरीया म्हणतस ना? याकोब,
योसेफ, शिमोन अनं यहूदा, या त्याना भाऊ शेतस ना? 56 अनी याना सर्व बहिणी
या आपलाबरोबर राहतस नही का? तर हाई सर्वा याले कोठेन मिळनं? 57 अस
ऐकीन त्यासले ठोकर लागनी. पण येशुनी त्यासले सांगं, संदेष्टाले आपला देश अनं
आपला घर, नातेवाईक यासमा सन्मान मिळस नही. 58 त्यासना अईश्वासमुये
त्यानी तठे जास्त चमत्कार करात नही.

**14** त्या दिनसमा हेरोद राजानी येशुबद्दल ऐकं; 2 अनी आपला सेवकसले सांगं,
हाऊ बाप्तिस्मा करनारा योहान शे; हाऊ मरेल मातीन ऊठेल शे म्हणीन या चमत्कार
त्यानामा व्हई राहिनात. 3 कारण हेरोदनी आपला भाऊ फिलीप्प यानी बायको
हेरोदीया हिनामुये बाप्तिस्मा करनारा योहानले धरीसन अनं बांधीन कैदखानामा

टाकेल व्हतं; 4 कारण योहान त्याले सांगे, की, तु तिले ठेवावं हाई तुनाकरता
योग्य नही; 5 अनी हेरोद राजा त्याले मारा करता दखे पण लोकसनी त्याले भिती
वाटे कारण लोके योहानले संदेष्टा समजेत. 6 नंतर हेरोदना जन्मदिन वना तवय
हेरोदियानी पोरनी दरबारमा नाचगाणा करीसन हेरोदले खूश करं. 7 म्हणीन त्यानी
तिले शपथ वाहिसन वचन दिधं की, जे काही तु मनापाशी मांगशी ते मी तुले
दिसु. 8 मंग तिले मायनी शिकाडेल प्रमाणे तिनी सांगं, बाप्तिस्मा करनारा योहाननं
मुंडकं ताटमा ठेईसन माले आठे आणी द्या. 9 तवय राजाले खुप वाईट वाटनं; तरी
आपली देयल शपथमुये अनी ज्या पंक्तिस्मा बठेल व्हतात त्यासनामुये त्यानी ते
देवानी आज्ञा करी. 10 तवय त्यानी माणसं धाडीसन कैदखानामा योहानना वध
करा. 11 मंग त्याना मुंडकं ताटमा ठेईसन पोरले आणी दिधं अनी तिनी ते आपली
मायनाजोडे आणं. 12 मंग त्याना शिष्यसनी ईसन त्यानं प्रेत उचलीन आणं अनं
त्याले पुरी टाकं; अनी जाईसन येशुले हाई बातमी दिधी. 13 हाई ऐकीसन येशु
तठेन नावमा बशीन निंघना अनी एकांतमा गया; हाई ऐकीसन लोकसनी गर्दी
नगरमातीन त्यानामांगे पायीपायी गयी. 14 मंग त्यानी बाहेर ईसन लोकसनी गर्दी
दखी; तवय त्याले त्यासनी किव वनी अनं त्यासनामा बराच रोगीसले त्यानी
बरं करं. 15 मंग संध्याकाय व्हवावर त्याना शिष्य त्यानाकडे ईसन बोलनात,
हाई एकांतनी जागा शे अनं येळ व्हई जायेल शे; तर लोकसनी गावमा जाईसन
स्वतःकरता खावाले अन्न ईकत लई येवाले पाहिजे म्हणीसन त्यासले निरोप द्या.
16 येशु त्यासले बोलना, लोकसले जावानी गरज नही; तुम्हीनच त्यासले खावाले
द्या. 17 त्या त्याले बोलनात, आमनाजोडे फक्त पाच भाकरी अनं दोन मासा शेतस.
18 येशुनी सांगं, ते ईकडं मनाजोडे आणा. 19 मंग येशुनी लोकसनी गर्दीले गवतमा
बसानी आज्ञा करी अनी त्या पाच भाकरी अनं दोन मासा लिसन त्यानी वर
आकाशमा दखीन आशिर्वाद मांगा अनी भाकरी मोडीसन शिष्यसकडे दिध्यात अनं
शिष्यसनी त्या लोकसले वाढी दिध्यात. 20 मंग त्या सर्वा खाईसन तृप्त व्हईनात;
अनी उरेल तुकडासना बारा टोपला त्यासनी भरी लिध्यात. 21 खाणारा सर्वा पाच
हजार माणसं व्हतात; अनी बाया अनं पोऱ्या या अजुन निराळाच व्हतात. 22 नंतर,
मी लोकसनी गर्दीले निरोप दिसन येस तोपावत तुम्हीन नावमा बशीन मनापुढे दुसरी
बाजुले जा, अस म्हणीसन येशुनी शिष्यसले लगेच धाडी दिधं. 23 मंग लोकसले
निरोप देवावर तो प्रार्थना कराले डोंगरवर एकलाच गया अनी रात व्हवावर पण येशु

तठे एकलाच व्हता. 24 ईकडं वारा तोंडना दिशातीन रहावामुये किनारापाईन बराच
अंतरमा नाव समुद्रना मधला भागमा लाटासघाई हैराण व्हई जायेल व्हती. 25 तवय
पहाटले तीन ते सव वाजाना दरम्यान येशु समुद्रवरतीन चालत त्यासनाजोडे वना.
26 शिष्य त्याले समुद्रवरतीन चालतांना दखीसन घाबरी गयात अनं त्या भ्याईसन
वरडनात; हाई भूत शे. 27 पण येशु त्यासले लगेच बोलना, धीर धरा मी शे; घाबरू
नका. 28 तवय पेत्रनी उत्तर दिधं, प्रभुजी, जर तुम्हीन शेतस तर पाणीवरतीन
तुमना जोडे येवाले माले सांगा. 29 त्यानी सांगं, ये; तवय पेत्र येशुकडे जावाकरता
नावमाईन उतरीसन चालाले लागना; 30 पण वारा दखीसन तो भ्याईना अनी बुडाले
लागना तवय तो वरडना, प्रभुजी, माले वाचाडा. 31 येशुनी लगेच हात पुढं करीसन
त्याले धरं अनं बोलना, अरे अल्पईश्वासी तु शंका कशाले धरी? 32 मंग त्या
नावमा चढनात तवय वारा बंद पडना. 33 तवय ज्या नावमा व्हतात त्या सर्वा त्याना
पाया पडीसन बोलनात, तुम्हीन खरोखर देवना पोऱ्या शेतस. 34 नंतर त्या दुसरा
बाजुले जाईसन गनेसरेत प्रांतमा गयात; 35 अनी तठला लोकसनी त्याले वळखीन
आपला आसपासना सर्वा नगरमा माणसं धाडीसन आजारी लोकसले त्यानाकडे
आणं. 36 अनी फक्त तुमना कपडासले आमले हात लावु द्या, अशी त्यासनी त्याले
ईनंती करी; तवय जितलासनी त्याले हात लावा तितला सर्वा बरा व्हईनात.

**15** मंग यरूशलेमतीन परूशी अनं शास्त्री येशुकडे ईसन बोलणात, 2 तुमना
शिष्य पुर्वजसना रितीरिवाज का बर मोडतस? कारण जेवणना पहिले त्या हात
धोतस नही. 3 त्यानी त्यासले उत्तर दिधं, तुमना रितीरिवाजकरता तुम्हीन बी
देवनी आज्ञा का बर मोडतस? 4 कारण देवनी सांगेल शे की, तु "तुना बाप अनी
तुनी माय यासना मान ठेव," अनी जो कोणी बापनी किंवा मायनी निंदा करस
त्याले मरणदंडनी शिक्षा व्हई; 5 पण तुम्हीन सांगतस की, जो कोणी स्वतःना माय
बापले अस सांगी, मी जे तुमले देणार व्हतु, ते मी देवले अर्पण करी टाकं. 6
त्यानी स्वतःना मायबापना मान नही ठेवा तरी चाली, हाई सांगीन तुम्हीन तुमना
रितीरिवाजकरता देवनं वचन मोडी टाकेल शे. 7 अरे ढोंगीसवन, यशया संदेष्टानी
तुमनाबद्दल बरोबर भविष्य करेल शे की, 8 ह्या लोके तोंडघाई मना सन्मान
करतस पण त्यासनं मन मनापाईन दुर शे. 9 त्या माणुसनी बनाडेल विधीसले मनं
शास्त्र मानिसन शिकाडतस अनं बिनकामनी मनी भक्ती करतस. 10 तवय त्यानी
लोकसनी गर्दीले जवळ बलाईन सांगं, ऐका अनं समजी ल्या. 11 जे तोंडमा जास

ते माणुसले अशुध्द करस नही, तर जे तोंडमाईन निंघस ते माणुसले अशुध्द करस.
12 नंतर शिष्य ईसन त्याले बोलणात, हाई वचन ऐकीन परूशी नाराज व्हयनात,
हाई तुमले समजनं का? 13 त्यानी उत्तर दिधं की, ज्या ज्या रोपटा मना स्वर्ग
माधला बापनी लायेल नही, त्या त्या उपटाई जातीन. 14 त्यासले राहु द्या; त्या
आंधया मार्गदर्शक शेतस, अनी आंधया आंधयाले ली जाई तर दोन्ही बी खड्डामा
पडतीन. 15 पेत्र त्याले बोलना, हाऊ दृष्टांत आमले फोडीन सांगा, 16 तो बोलना,
तुमले बी अजुन समजनं नही का? 17 जे तोंडमा जास ते पोटमा उतरस अनं नंतर
शरिरबाहेर टाकाय जास, हाई तुमले समजत नही का? 18 जे तोंडमाईन निंघस
ते मनमातीन येस अनं माणुसले अशुध्द करस. 19 मनमातीन दुष्ट ईचार, खुन,
व्यभिचार, जारकर्मे, चोऱ्या, खोट्या साक्षी, गाळ्या, निंदा, ह्या निंघतस. 20 ह्या
गोष्टी माणुसले अशुध्द करतस; हात न धोता जेवण करानं हाई माणुसले अशुध्द
करस नही. 21 नंतर येशु तठेन निंघीन सोर अनं सिदोन प्रांतमा गया; 22 अनी
दखा, त्या प्रांतमातीन एक कनानी बाई ईसन वरडीन बोलनी, प्रभु, दावीदना पोऱ्या,
मनावर दया कर, मनी पोरले दुष्ट आत्मा भलताच तरास दि ऱ्हाईना शे. 23 तरी तो
तिले काहीच नही बोलना; तवय त्याना शिष्यसनी जोडे ईसन त्याले ईनंती करी
की, तिले परत धाडी द्या; कारण ती आमनामांगे वरडत ई राहिनी. 24 त्यानी उत्तर
दिधं, माले इस्त्राएलना खानदानमधला दवडायेल मेंढरसशिवाय दुसरा कोणाचकरता
धाडेल नही शे. 25 तवय ती ईसन त्याना पाया पडीन बोलनी, प्रभुजी, माले मदत
करा. 26 येशुनी उत्तर दिधं, पोऱ्यासनी भाकर लिसन कुत्राले टाकानी हाई बराबर
नही शे. 27 ती बोलनी, बराबर शे, प्रभु; पण कुत्रा बी आपला मालकना ताटमातीन
पडेल उष्ट खातस. 28 तवय येशुनी तिले उत्तर दिधं, बाई, "तुना ईश्वास मोठा
शे, जशी तुनी ईच्छा शे तस तुनाकरता होवो; अनी त्याच येळले तिनी पोर बरी
व्हयनी." 29 नंतर येशु तठेन निंघीन गालील समुद्रजोडे वना, अनं डोंगरवर
जाईन बठना 30 मंग लोकसनी गर्दी त्यानाकडे वनी; त्यासनासंगे लंगडा, पांगया,
आंधया, मुक्का अनं दुसरा बराच जण व्हतात; त्यासले त्यासनी त्याना पायजोडे
ठेई दिधं अनी त्यानी त्यासले बरं करं. 31 लोकसनी गर्दीनी हाई दखं की मुक्का
बोलतस, पांगया बरा व्हतस, लंगडा चालतस अनं आंधया दखतस तवय लोके
आश्चर्यचकीत व्हयनात अनी त्यासनी इस्त्राएलना देवना गौरव करा. 32 मंग येशुनी
आपला शिष्यसले बलाईन सांगं, माले लोकसनी किव ई राहीनी, कारण तिन

दिनपाईन त्या मनासंगे शेतस अनी त्यासनाजोडे खावाले काहीच नही; कदाचित
त्या वाटमा मरगळेलना मायक पडतीन; म्हणीन त्यासले भूक्या धाडानी मनी ईच्छा
नही शे. **33** शिष्यसनी त्याले सांगं, असा जंगलमा इतला लोकसनी भूक मिटी
इतल्या भाकरी आमनाजोडे कोठेन येतीन? **34** येशुनी त्यासले ईचारं, तुमना जोडे
कितल्या भाकरी शेतस? त्या बोलणात सात भाकरी अनं काही धाकला मासा. **35**
मंग त्यानी लोकसनी गर्दीले जमीनवर बठाले सांगं. **36** नंतर त्यानी त्या सात
भाकरी अनं धाकला मासा लिसन देवना उपकार मनीन; त्या मोडीसन शिष्यसले
दिध्यात अनी शिष्यसनी ते लोकसले वाटी दिध्यात. **37** मंग त्या सर्वा खाईसन तृप्त
व्हयनात अनी उरेल तुकडसना सात टोपला भरी लिधात. **38** जेवढासनी खादं
त्यानामा बाया अनं पोऱ्या सोडीसन चार हजार माणसे व्हतात. **39** मंग लोकसनी
गर्दीले घर धाडावर तो नावमा बशीन मगदानना प्रांतमा वना.

**16** तवय परूशी अनी सदुकी यासनी ईसन येशुनी परिक्षा दखाकरता, त्याले सांगं
आमले आकाशमातील काहीतरी चिन्ह दखाड. **2** त्यानी त्यासले उत्तर दिधं, जवय
संध्याकाय व्हस तवय तुम्हीन सांगतस, थंडावा राही कारण आकाश लाल शे; **3**
अनी तुम्हीन पहाटले म्हणतस, आज वादळी वारा सूटी, कारण आकाश लाल
भयानक शे, आकाशना लक्षणं तुमले वळखाणं जमस पण काळना लक्षणं तुमले
वळखता येतस नही! **4** हाई दुष्ट अनं व्यभिचारी पिढी चिन्ह मांगस, पण ईले योना
संदेष्टना चिन्हशिवाय दुसरा चिन्ह मिळाव नही. मंग येशु त्यासले सोडीसन निंघी
गया. **5** नंतर शिष्य दुसरी बाजुले गयात पण त्या भाकरी लेवाले ईसरी गयात. **6**
तवय येशु त्यासले बोलना, परूशी अनं सदुकी यासना खमीरपाईन सावधान राहा.
**7** तवय त्या चर्चा करीसन एकमेकसले बोलणात, आपण भाकरी लयनुत नही
म्हणीन हाऊ असा बोली राहीना. **8** पण येशु हाई वळखीन बोलना, अरे ओ
अईश्वासीहो, तुम्हीन मनमा अस का बर आणतस की, आपलाजोडे भाकरी नही
शेतस म्हणीन हाऊ अस बोली राहीना. **9** तुमले अजुन नही समजनं का, पाच
हजार लोकसकरता पाच भाकरी व्हत्यात तवय तुम्हीन कितला टोपला उचलात?
**10** तसाच चार हजार लोकसले सात भाकरी वाटावर कितला टोपला उचलात;
यानी तुमले आठवण नही काय? **11** मी भाकरीसनाबद्दल बोलनु नही, हाई तुम्हीन
समजी का बर लेतस नही? पण मी तुमले हाई सांगस की, तुम्हीन परूशी अनं
सदुकी यासना खमीरपाईन सावधान राहा. **12** तवय त्यासले समजनं की, त्यानी

भाकरना खमीरबद्दल नही, तर परूशी अनं सदुकी यासना शिक्षणबद्दल सावध
ऱ्हावाले सांगं. 13 नंतर फिलीप्पना कैसरियाना गावसमा येवावर, येशुनी त्याना
शिष्यसले ईचारं, मनुष्यना पोऱ्याले लोक काय म्हणतस? 14 त्यासनी उत्तर दिधं,
काही म्हणतस बाप्तिस्मा करनारा योहान, काही म्हणतस एलिया, अनी बाकीना
यिर्मया किंवा संदेष्टामधला एक, असा म्हणतस. 15 त्यानी त्यासले ईचारं, पण
"तुम्हीन काय म्हणतस, मी कोण शे?" 16 शिमोन पेत्रनी उत्तर दिधं, तुम्हीन जिवत
देवना पोऱ्या ख्रिस्त शेतस. 17 येशु त्याले बोलना, योनाना पोऱ्या शिमोन तु धन्य
शे, कारण हाई रक्त मांसना माणुसपाईन नही, तर मना स्वर्गमधला बापनी हाई तुले
प्रकट करेल शे. 18 आखो मी तुले हाई बी सांगस, पेत्र खडक शे अनी हाऊ
खडकवरच मी मनी मंडळी बनाडसु, अनी नरकनी कोणतीच शक्तीना त्यावर
प्रभाव पडाव नही. (Hadēs g86) 19 मी तुले स्वर्गना राज्यना किल्ल्या दिसु, अनी
पृथ्वीवर जे काही तु बंद करशी ते स्वर्गमा बंद कराई जाई, अनी पृथ्वीवर जे काही
तु उघडशी ते स्वर्गमा उघडाई जाई. 20 तवय त्यानी शिष्यसले बजाईन आज्ञा करी
की, मी ख्रिस्त शे हाई कोणले सांगु नका. 21 त्या येळपाईन येशु त्याना शिष्यसले
सांगु लागना, हाई व्हवानं आवश्यक शे की, "मी यरूशलेमले जासु वडील लोके,
मुख्य याजक अनं शास्त्री यासनाकडतीन मना भलता छळ व्हई, माले मारी टाकतीन
अनं तिसरा दिनले मी परत जिवत व्हसू." 22 तवय पेत्र त्याले बाजुले लई गया
अनं विरोध करी बोलना, प्रभुजी, तुमनावर दया होवो, अस तुमनासंगे व्हणारच
नही. 23 पण तो वळीसन पेत्रले बोलना, अरे सैतान, मनासमोरतीन निंघी जाय; तु
माले आडफाटा शे; कारण देवना गोष्टीसकडे तुनं ध्यान नही, माणससना गोष्टीसकडे
शे. 24 मंग येशुनी त्याना शिष्यसले सांगं, मनामांगे येवानी ज्यानी ईच्छा शे त्यानी
स्वतःना त्याग कराना अनी स्वतःना क्रुसखांब उचलीसन मनामांगे चालानं. 25
कारण जो कोणी स्वतःना जिव वाचाडाले दखी तो त्याले गमाडी; अनी जो कोणी
मनाकरता स्वतःना जिव गमाडी त्याले तो परत मिळी. 26 माणुसले जगमाधलं सर्व
सुख भेटणं अनी स्वतःना जिव गमाडा तर त्याले काय फायदा व्हई? किंवा माणुस
स्वतःना जिवना बदलामा काय दि? 27 कारण मनुष्यना पोऱ्या स्वर्गदूतससंगे
आपला बापना गौरवमा ई, तवय तो प्रत्येकले ज्याना त्याना कामप्रमाणे प्रतिफळ दि.
28 मी तुमले सत्य सांगस की, काहीजण आठे असा उभा शेतस की, त्या मनुष्यना
पोऱ्याले त्याना राज्यमा त्याले दखाशिवाय त्यासले मरणना अनुभव येवावुच नही;

**17** मंग येशु सव दिन नंतर पेत्र, याकोब अनं त्याना भाऊ योहान यासले एक
उंच डोंगरवर एकांतमा लई गया. **2** तवय त्याना रूप त्यासनासमोर बदलनं;
त्याना चेहरा सूर्यनामायक तेजस्वी व्हयना, त्याना कपडा धवळा शुभ्र व्हयनात.
**3** तवय दखा, मोशे अनं एलिया ह्या त्यानासंगे बोलतांना त्यासले दखायनात.
**4** मंग पेत्र येशुले बोलना, प्रभुजी आपण आठे राहसुत तर कितलं भारी व्हई;
तुमनी ईच्छा व्हई तर मी आठे तिन मंडप बनाडस; तुमनासाठे एक, मोशेकरता
एक, अनं एलियाकरता एक. **5** तो बोली राहिंता तेवढामा, दखा, तेजस्वी ढगनी
त्यासले झाकी दिधं अनी दखा, ढगमातीन अशी वाणी व्हईनी; हाऊ मना पोऱ्या,
माले परमप्रिय शे, ह्यानावर मी खूश शे; तुम्हीन यानं ऐका. **6** हाई ऐकीन येशुना
शिष्य भलता घाबरणात अनं पालथा पडी गयात. **7** तवय येशु त्यासनाजोडे ईसन
हात लाईन बोलना, ऊठा, घाबरू नका. **8** मंग त्यासनी वर दखं तवय त्यासले
येशुशिवाय कोणीच दखायनं नही. **9** नंतर त्या डोंगरवरतीन खाल उतरी राहींतात
तवय येशुनी त्यासले आज्ञा करी की, मनुष्यना पोऱ्या मरेल मातीन परत जिवत व्हई
तोपावत हाई गोष्ट कोणलेच सांगु नका. **10** त्यावर त्याना शिष्यसनी त्याले ईचारं
की, एलिया पहिले येवाले पाहिजे अस शास्त्री का बर म्हणतस? **11** येशुनी उत्तर
दिधं, "एलिया" ईसन सर्वकाही सुधारी हाई खरं शे. **12** पण मी तुमले सांगस की,
एलिया येल शे अनी त्यासनी त्याले न वळखता त्यासना मनले पटनं तसं त्यानासंगे
करं; तसच मनुष्यना पोऱ्याले बी त्यासनाकडतीन छळ सहन करना पडी. **13**
तवय शिष्यसले समजनं, हाऊ बाप्तिस्मा करनारा योहानबद्दल बोली राहीना. **14**
नंतर त्या लोकसजोडे वनात तवय एक माणुस येशु समोर ईसन गुडघा टेकीन
बोलना, **15** प्रभुजी मना पोऱ्यावर दया करा, कारण त्याले मिर्गी येस, त्याले
भलता तरास व्हस; तो घडीघडी आगमा अनं पाणीमा पडस. **16** म्हणीन मी त्याले
तुमना शिष्यसकडे आणं, पण त्यासनाघाई तो बरा व्हयना नही. **17** तवय येशुनी
उत्तर दिधं, अरे ओ भ्रष्ट पिढी, कोठपावत मी तुमनासंगे ऱ्हासु? कोठपावत तुमनं
सहन करसु? त्या पोऱ्याले मनाकडे लई या. **18** मंग येशुनी दुष्ट आत्माले आज्ञा
दिधी, तवय त्या पोऱ्यामातीन तो निंघी गया अनी त्याच येळले पोऱ्या बरा व्हयना.
**19** नंतर शिष्य एकांतमा येशुजोडे ईसन बोलणात, आमनाघाई तो दुष्ट आत्मा का बर
नही निंघना? **20** त्यानी त्यासले सांगं, तुमना बिनईश्वासमूये; कारण मी तुमले
सत्य सांगस की, जर तुमनामा राईना दाणा एवढा जरी ईश्वास व्हई तर हाऊ

डोंगरले आठेन तिकडे सरक अस तुम्हीन सांगं तर तो सरकी; अनं तुमले काहीच
अशक्य ऱ्हावाव नही. 21 तरी बी हाई भूतनी जात प्रार्थना अनं उपासशिवाय निंघस
नही. 22 त्या गालील नगरमा गोया व्हयनात तवय येशु त्यासले बोलना, मनुष्यना
पोऱ्याले लोकसना हातमा धरीन देतीन. 23 त्या माले मारी टाकतीन अनी तिसरा
दिनले तो परत जिवत व्हई, तवय त्या भलताच नाराज व्हयनात. 24 जवय त्या
कफर्णहुम गावमा वनात तवय मंदिरना कर गोया करनारानी पेत्रले ईचारं, तुमना गुरू
मंदिरना कर नहीं देस का? 25 तो बोलना, हा देस, मंग तो घरमा येवावर काही
बोलाना पहिलेच येशुनी त्याले ईचारं, शिमोन, तुले काय वाटस? पृथ्वीवरला राजा
कोणाकडतीन कर लेतस? आपला पोऱ्यासकडतीन की परकासकडतीन? 26 तो
बोलना, परकासकडतीन मंग येशु त्याले बोलना, म्हणीन पोऱ्या कर भरापाईन मुक्त
शेतस. 27 पण त्यासनाकरता आपण अडथळा बनाले नको, म्हणीन तु समुद्रमा
जाईसन गळ टाक; अनी जो मासा पहिले वर ई, तो मासा धरीन त्यानं तोंड उघाड;
म्हणजे तुले दोन रूपया सापडतीन त्या लिसन मनाबद्दल अनं तुनाबद्दल त्यासले दे.

**18** त्या येळले शिष्य येशुकडे ईसन बोलणात, स्वर्गना राज्यमा मोठा कोण? 2
तवय त्यानी एक धाकला पोऱ्याले बलाईन त्याले त्यासना मझार उभं करं अनी
बोलना; 3 मी तुमले सत्य सांगस, की, तुमनं मन बदलाशिवाय अनं तुम्हीन
धाकला पोऱ्यासना मायक व्हवाशिवाय स्वर्गना राज्यमा तुमना प्रवेश व्हवावुच
नही. 4 यामुये जो कोणी स्वतःले ह्या धाकला पोऱ्यासना मायक नम्र करी, तोच
स्वर्गना राज्यमा मोठा व्हई; 5 अनी जो कोणी मना नावतीन असा धाकला पोऱ्याले
जवळ करी त्यानी माले जोडे करं अस व्हई 6 अनी जो कोणी मनावर ईश्वास
ठेवणारा या धाकलासपैकी एखादाले जरी पाप कराले प्रवृत्त करस, त्याना गळामा
जातानी मोठी तळी बांधीन समुद्रमा खोल पाणीमा बुडाई देवाणं यामा त्यानं हित
शे. 7 आडफाटासमुये जगना धिक्कार असो! आडफाटा तर येतीनच, पण जो
माणुस आडफाटा लई, त्याना धिक्कार असो! 8 तुना हात किंवा तुना पाय तुले
आडफाटा करी तर त्या तोडीन फेकी दे; दोन हात किंवा दोन पाय राहिसन
सार्वकालिक अग्नीमा पडापेक्षा लंगडा व्हईसन सार्वकालिक जिवनमा जावानं
हाई तुनाकरता चांगल शे. **(aiōnios g166)** 9 तुना डोयानी आडफाटा करा, तर
तो उपटी टाक; दोन डोया राहिसन अग्नीनरकमा पडापेक्षा एक डोया राहीसन
सार्वकालिक जिवनमा जावानं हाई तुनाकरता चांगल शे. **(Geenna g1067)** 10

“दखा, तुम्हीन ह्या धाकला लेकरंसपैकी एकले बी तुच्छ मानु नका; कारण, मी
तुमले सांगस की, स्वर्गमा त्यासना देवदूत मना स्वर्ग माधला बापनं तोंड कायम
दखतस.” 11 आखो ज्या दवडायेल शेतस त्यासनं तारण कराले मनुष्यना पोऱ्या
येल शे. 12 तुमले काय वाटस; जर एक माणुसजोडे शंभर मेंढरं शेतस अनी
त्यामातीन एक मेंढरू दवडी गयं, तर तो माणुस त्या नव्यान्नव मेंढरसले डोंगरवर
सोडीन त्या दवडेल मेंढरूले दखाले जावाव नही का? 13 कदाचित ते त्याले
सापडनं तर, त्यानाकडे ज्या नव्यान्नव मेंढरं सुरक्षित व्हतात त्यासनापेक्षा जास्त
आनंद त्याले ते मेंढरू सापडावर व्हई, हाई मी तुमले सत्य सांगस. 14 तसच ह्या
धाकलासनामाधला कोणाच नाश व्हवाले नको अशी तुमना स्वर्ग माधला बापनी
ईच्छा शे. 15 जर तुना भाऊ पाप करी, तर जा अनी त्याले एकांतमा लई जाईन
समजाड, जर त्यानी तुनं ऐकं तर तुना भाऊ तुले परत भेटी गया. 16 पण त्यानी जर
तुनं नही ऐकं तर तु आखो दोन एक जणसले तुनासंगे लई जा; यानाकरता की,
तुम्हीन दोन्ही जे बोलशात त्या प्रत्येक शब्दना ज्या दोन किंवा तीन शेतस त्या
साक्षीदार राहतीन अनी त्या बी समजाडतीन. 17 अनी जर त्यानी त्यासनं बी ऐकं
नही तर मंडळीले सांग; अनी त्यानी मंडळीनं बी नही ऐकं तर, तो तुनासाठे एक
जकातदार किंवा परकानामायक व्हवो. 18 मी तुमले सत्य सांगस की, जे काही
तुम्हीन पृथ्वीवर बंद करशात ते स्वर्गमा बंद व्हई; अनी जे काही तुम्हीन पृथ्वीवर
खोलशात, ते स्वर्गमा खोलाई जाई. 19 आखो मी तुमले सत्य सांगस, पृथ्वीवर
तुमना मातीन दोनजण कोणतीही एक गोष्टकरता एकचित्त व्हईन ईनंती करतीन तर
ती ईनंती मना स्वर्ग माधला बापकडतीन पुरी कराई जाई; 20 कारण जठे दोन
किंवा तिन जण मना नावतीन एकत्र जमतस, तठे त्यासनामा मी शे. 21 तवय पेत्र
येशुकडे ईसन बोलना, प्रभुजी मना भाऊनी मनाविरूध्द अपराध करा, तर मी त्याले
कितला दाव माफ करू? सात दाव का? 22 येशुनी त्याले सांगं, मी तुले अस नही
म्हणस की, सात दाव, तर सातना सत्तरदाव कर. 23 यामुये स्वर्गनं राज्य एक
राजाना मायक शे; त्या राजाले आपला सेवकसकडतीन हिशोब ल्यावा अस वाटनं;
24 अनी जवय तो हिशोब ली राहिंता तवय ज्यानावर कोटी रूपया कर्ज व्हतं त्याले
त्यानाकडे आणं. 25 पण त्यान्याकडे कर्ज फेडाले काहीच नव्हतं म्हणीन त्याना
मालकनी हुकूम करा की, त्यानी बायको, पोऱ्या अनं त्यानं जे काही व्हई ते
ईकीसन त्यानी कर्ज फेडानं. 26 तवय त्या दासनी त्याना पाया पडीसन सांगं, माले

वागाडी ल्या, म्हणजे मी सर्वकाही फेडी दिसु 27 तवय त्या धनीले त्यानी दया वनी
अनी त्यानी त्याले अनं त्यानं कर्ज बी माफ करी दिधं. 28 तो सेवक बाहेर गया
अनी ज्यानाकडे त्याना शंभर दिनार रूपया बाकी व्हतात असा त्याना जोडीना
सेवक त्याले दखायना, तवय त्यानी त्या सेवकनी गचांडी धरीन बोलना, तुनाकडे
मनं जे लेणं शे ते दे. 29 त्या सेवकनी पाया पडीन रावण्या करात, माले वागाडी ले,
म्हणजे तुनं देणं मी फेडी दिसु; 30 पण त्यानी त्यानं अजिबात ऐक नही तो कर्ज
फेडत नही तोपावत त्यानी त्याले बंदिगृहमा टाकी दिधं. 31 तवय हाऊ घडेल
प्रकार दखीसन त्यानासंगेना सेवकसले दुःख व्हयनं अनी त्यासनी ईसन सर्वा प्रकार
आपला मालकले सांगा. 32 तवय त्याना मालकनी त्याले बलाईन सांगं, अरे
दुष्ट सेवका, तु माले ईनंती करी अनी मी तुनं सर्व कर्ज माफ करं; 33 जशी दया
मी तुनावर करी, तशी तुले तुना जोडीदार सेवकवर करता नही वनी का? 34
मंग त्याना मालकनी संतापमा त्याले सर्व कर्ज फेडस तोपावत शिक्षा भोगाकरता
बंदीगृहाना ताबामा दिधं. 35 जर तुम्हीन प्रत्येक आपापला बंधुजणसले मनपाईन
माफ कराव नही, तर मना स्वर्ग माधला बाप बी तुमनासंगे तसच करी.

**19** नंतर अस व्हयनं की, हाई बोलनं समाप्त करावर येशु गालीलमाईन निंघीन
यार्देन नदीना पलीकडला यहूदीया प्रदेशमा गया. 2 तवय लोकसनी गर्दी त्यानामांगे
गयी; तठे त्यानी त्यासले बरं करं. 3 नंतर परूशी त्यानाकडे ईसन त्यानी परिक्षा
दखाकरता बोलणात, बायकोले कोणतं बी कारण वरतीन सोडी देवाणं हाई योग्य शे
का? 4 येशुनी त्यासले उत्तर दिधं, हाई तुमना वाचामा वनं नही का, की ज्यानी
त्यासले निर्माण करं, "त्यानी सुरवातलेच पुरूष अनी स्त्रीले बनाडं." 5 अनं सांगं,
"यामुये पोऱ्या माय बापले सोडीसन बायकोसंगे कायम राही अनी त्या एकदेह
व्हतीन" 6 यामुये पुढे त्या दोन नहीत एकदेह असा शेतस म्हणीन "देवनी जे
जोडेल शे ते मनुष्यनी तोडाना प्रयत्न करानं नही" 7 त्या त्याले बोलणात, तर
"बायकोले सुटपत्र दिसन तिले सोडानं" अशी आज्ञा मोशेनी का बर दिधी? 8
येशुनी त्यासले सांगं, तुमना निर्दय मनमुये मोशेनी तुमले तुमन्या बायका सोडु
दिध्यात पण सुरवात पाईन अस नव्हतं. 9 मी तुमले सत्य सांगस की, जो कोणी
आपली बायकोले व्यभिचारना कारणतीन सोडीन दुसरी करस तो व्यभिचार करस;
अनी जो कोणी अशी सोडेल बाईसंगे लगीन करस तो बी व्यभिचार करस. 10
शिष्य त्याले बोलणात, जर माणुसना आपली बायकोसंगे असाच संबंध ऱ्हास तर

लगीन न करेलच बरं. 11 त्यानी त्यासले सांगं, हाई वचन सर्वासघाई पाळाई जास
नही; ज्यासले हाई दान देयल शे, त्यासनाघाईच हाई पाळाई जास. 12 कारण
काहीजण मायना कोखपाईन नपुंसक जन्मले येल शेतस, माणससनी बनाडेल असा
बी नपुंसक शेतस, अनी स्वर्गना राज्यकरता स्वतःले नपुंसक करी लिधं असा बी
शेतस. ज्याले हाई स्विकारता येस तोच स्विकारस. 13 नंतर येशुनी लेकरसवर हात
ठिसन प्रार्थना कराले पाहिजे म्हणीन त्यानाजोडे त्यासले आणं; पण शिष्यसनी
आणनारासले धमकाडं. 14 येशु बोलणा, बालकसले मनाकडे येऊ घा त्यासले
मना करू नका, कारण स्वर्गनं राज्य यासना मायकसनंच शे. 15 मंग त्यासनावर
हात ठेईन आशिर्वाद दिसन तो तठेन निंघी गया, 16 नंतर दखा, एकजण ईसन
येशुले बोलना, गुरजी, माले सार्वकालिक जिवन मिळावं म्हणीन मी कोणतं चांगलं
काम करू? **(aiōnios g166)** 17 त्यानी त्याले सांगं, माले चांगलंपणबद्दल का
बर ईचारस? चांगलं अस एकच शे, जर तु सार्वकालिक जिवनमा प्रवेश कराले
दखस तर देवनी आज्ञा पाळ. 18 त्यानी त्याले ईचारं, कोणत्या? येशुनी सांगं,
“मनुष्यहत्या करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको. 19 आपला
बाप अनी आपली माय यासना मान राख” अनी जशी स्वतःवर तशी आपला
शेजारीसवर प्रिती कर. 20 तो तरूण त्याले बोलना, मी हाई सर्व पाळेल शे; मनामा
अजुन काय कमी शे? 21 येशुनी त्याले सांगं, तुले परीपुर्ण होणं शे, तर जाय, तुनी
धनदौलत इकीसन गरीबसले दे म्हणजे तुले स्वर्गमा धन भेटी; अनी चल, मनामांगे
ये. 22 पण हाई ऐकीसन तो दुःखी व्हईन निंघी गया, कारण त्यानाकडे भरपुर
धनदौलत व्हती. 23 तवय येशुनी आपला शिष्यसले सांगं, मी तुमले सत्य सांगस
की, स्वर्गना राज्यमा धनवानसना प्रवेश व्हणं कठीण शे. 24 आखो तुमले सांगस,
देवना राज्यमा धनवानसना प्रवेश व्हणं यानापेक्षा उंटले सुईना नाकमातीन जाणं सोपं
शे. 25 हाई ऐकीन शिष्य भलताच थक्क व्हईसन बोलणात, तर मंग कोणं तारण
व्हई? 26 येशुनी त्यासनाकडे दखीन सांगं, हाई मनुष्यले अशक्य शे, “देवले
तर सर्व शक्य शे” 27 तवय पेत्र त्याले बोलना, आम्हीन सर्व सोडीसन तुमना
मांगे येल शेतस, तर आमले काय भेटी? 28 येशुनी त्यासले सांगं, मी तुमले सत्य
सांगस की, जवय सर्वकाही परत नवं व्हई जाई, तवय मनुष्यना पोऱ्या आपला
गौरवी राजासनवर बठी, तवय मनामांगे चालणारा तुम्हीन बारा राजासनसवर बठीन
इस्त्राएलसना बारा वंशसना न्यायनिवाडा करशात. 29 आखो ज्यानी कोणी मना

नावतीन घरदार, भाऊ, बहिणी, माय, बाप, पोऱ्या किंवा वावर सोडेल शेतस,
त्याले हाई शंभरपट भेटीन सार्वकालिक जिवन हाई वतन भेटी. **(aiōnios g166)**
**30** तरी बराच जणससंगे अस व्हई की, ज्या पहिला शेतस त्या शेवटला व्हतीन
अनं ज्या शेवटला शेतस त्या पहिला व्हतीन.

**20** “स्वर्गना राज्य त्या घरमालकना मायक शे; जो आपला द्राक्षमयामा रोजी
मजुर लावाकरता सकायमा बाहेर निंघना.” **2** अनी त्यानी रोजनी मजुरी एक
चांदिना शिक्का ठराईन मजुरसले द्राक्षमयामा धाडी दिधं. **3** मंग तो जवळपास नऊ
वाजाले घरना बाहेर गया, तवय त्यानी काही जणसले बजारमा रिकामं उभं दखं.
**4** तो त्यासले बोलना, तुम्हीन बी द्राक्षमयामा जा, जी मजुरी व्हई ती मी तुमले दिसु;
अनी त्या गयात. **5** मंग जवळपास बारा वाजता अनं तिन वाजता तो बाहेर गया
तवय पण त्यानी तसच करं. **6** जवळपास पाच वाजाले तो बाहेर गया, तवय
आखो कित्येक जणसले रिकाम उभं दखं. तवय त्यानी त्यासले ईचारं, तुम्हीन पुरा
दिन का बर आठे रिकामा उभा राहेल शेतस? **7** त्या त्याले बोलणात, आमले
कोणी कामवर लाय नही म्हणीन त्यानी त्यासले सांगं, तुम्हीन बी मना द्राक्षमयामा
जा. **8** मंग संध्याकायले द्राक्षमयाना मालकनी त्याना कारभारीले सांगं, मजुरसले
बलाई आनं अनी शेवटला मजुरसपाईन सुरवात करीसन पहिला मजुरपावत त्यासले
मजुरी दे. **9** तवय जवळपास संध्याकायना पाच वाजता ज्यासले कामवर लायल
व्हतं त्यासले पुरा रोज एक चांदीना शिक्का भेटना. **10** मंग पहिला मजुर वनात
अनी आपले त्यासनापेक्षा जास्त मजुरी भेटी अस त्यासले वाटणं, पण त्यासले बी
तेवढाच रोज भेटना. **11** तो त्यासनी लेवानंतर त्या मालकबद्दल कुरकुर करीसन
बोलणात, **12** ह्या शेवटलासनी एकच तास काम करा अनी आम्हीन दिनभर
ऊनतान्हमा कष्ट करात तरी तुम्हीन आमले अनी त्यासले मायकच रोज दिधा. **13**
तवय त्यानी मजुरसमधला एकले उत्तर दिधं, अरे दोस्त, मी तुनावर अन्याय नही
करा. हाईच मजुरीमा दिनभर काम करानं, हाई आपलं ठरेल व्हतं ना. **14** जे तुले
भेटेल शे ते लिसन निंघी जाय; जेवढं तुले तेवढं शेवटनासले पण देवानं अशी मनी
ईच्छा शे. **15** जे मनं शे त्यानं मी मना मर्जीप्रमाणे करसु, मी कोणा बांधायेल शे
का? मनं उदार वागनं तुना डोयामा येस का? **16** याप्रमाणेच शेवटला त्या पहिला
अनी पहिला त्या शेवटला व्हतीन. **17** यरूशलेमले जातांना येशुनी वाटमा त्याना
बारा शिष्यसले एकांतमा लई जाईन सांगं, **18** दखा, आपण यरूशलेमले जाई

राहिनुत; मनुष्यना पोऱ्याले मुख्य याजक अनं शास्त्री यासना हवाले करतीन, त्या
त्याले मरणदंडसाठे दोषी ठरावतीन. 19 त्या त्यानी थट्टा कराले, फटका माराले
अनं क्रुसखांबवर खियाले त्याले गैरयहूदीसना हवाले करतीन अनी तिन दिनमा तो
परत जिवत व्हई. 20 तवय जब्दीना पोऱ्यासनी माय तिना पोऱ्याससंगे येशुकडे गई
अनी त्याना पाया पडीसन त्याले एक ईनंती करी 21 येशुनी तिले ईचारं, तुले काय
पाहिजे? ती त्याले बोलनी, तुना राज्यमा मना ह्या दोन्ही पोऱ्यासमाधला एकले
उजवीकडे अनी दुसराले तुना डावीकडे बसाडं, अशी मनी ईच्छा शे. 22 येशुनी
तिले उत्तर दिधं की, तुम्हीन काय मांगी राहीनात तुमले समजत नही. जो प्याला मी
पेवाव शे तो तुमले पिता ई का त्या त्याले बोलनात, पिता ई. 23 त्यानी त्यासले
सांगं, मना प्याला तुम्हीन पिशात हाई खरं, पण मना उजवीकडे अनं डावीकडे
बसाना अधिकार देनं मनाकडे नहीं शे, तर ज्यासनाकरता मना बापनी हाई जागा
तयार करेल शे, हाई त्यासनाकरता शे. 24 हाई गोष्ट ऐकीन दहा शिष्यसले त्या
दोन्ही भाऊसना राग वना. 25 येशुनी त्यासले बलाईसन सांगं, गैरयहूदीसमा
अधिकारी प्रभुत्व चालाडतस अनं मोठा लोके बी अधिकार गाजाडतस हाई तुमले
माहीत शे. 26 पण तुमनामा तसं व्हवाले नको; म्हणीन तुमनामा ज्याले कोणले श्रेष्ठ
होणं शे, त्यानी पहिले तुमना सेवक व्हवाले पाहिजे. 27 अनी तुमनामा ज्याले
पहिला व्हवानी ईच्छा शे, त्यानी तुमना दास व्हवाले पाहिजे. 28 यामुये मनुष्यना
पोऱ्या सेवा करी लेवाले नही तर सेवा कराले अनी बराच लोकसना पापनं मोल
म्हणीन आपला जीव देवाले येल शे. 29 मंग त्या यरीहो शहरतीन जाई राहींतात
तवय लोकसनी मोठी गर्दी त्यासना मांगे चाली राहींती. 30 तवय दखा, वाटवर
बशेल दोन आंधयासनी येशु जवळतीन जाई राहीना, हाई ऐकीन, त्या वरडीसन
बोलणात, "प्रभु, अहो दावीदना पोऱ्या, आमनावर दया करा." 31 तवय त्यासले
लोकसनी वरडू नका अस धमकाडं, पण त्या जास्तच वरडीन बोलु लागणात,
"प्रभु, अहो दावीदना पोऱ्या! आमनावर दया करा." 32 येशुनी ऊभं राहीसन
त्यासले बलाईन सांगं, "मी तुमनाकरता काय करू अशी तुमनी ईच्छा शे?" 33
त्या बोलणात, "प्रभुजी, आमनी ईच्छा शे की, आमना डोया उघडी जावोत." 34
तवय येशुले त्यासनी किव वनी त्यानी त्यासना डोयाले स्पर्श करा; तवय त्यासले
लगेच दखावु लागनं, अनी त्या त्याना मांगे चालु लागणात.

21 त्या यरूशलेमले ई राहींतात तवय जैतुनना डोंगरजोडे बेथफगे गावले
पोहचनात; तवय येशुनी दोन शिष्यसले अस सांगीन धाडं की, 2 तुम्हीन समोरना
गावमा जा, अनी तठे जाताच एक बांधेल गधडी अनं तिनाजोडे एक शिंगरू तुमले
दखाई; त्यासले सोडीसन मनाकडे आणा; 3 अनी जर कोणी तुमले काही ईचारं,
तर प्रभुले यानी गरज शे, अस सांगा म्हणजे त्या तुमले ते आणु देतीन. 4 संदेष्टासद्वारे
जी भविष्यवाणी व्हयेल व्हती ती पुरी व्हवाकरता हाई व्हयनं; ते अस की, 5
सियोनना कन्याले सांगा, दखा, तुना राजा तुनाकडे ई राहीना; तो नम्र शे म्हणीन तो
गधडावर, म्हणजे शिंगरूवर बशेल शे. 6 तवय शिष्यसनी येशुना आज्ञाप्रमाणे करं;
7 गधडी अनं शिंगरू यासले आणीन त्यासवर आपला कपडा टाकात अनं तो त्यावर
बसना. 8 मंग लोकसनी गर्दीमातीन बराच लोकसनी त्यासना कपडा वाटवर
पसारात; बाकीनासनी झाडसन्या बारीक फांघा तोडीन वाटवर पसाऱ्यात; 9 अनी
त्यानापुढे अनं मांगे चालणारा लोके गजर करीसन बोलणात, दावीदना पोऱ्याले
होसान्ना; प्रभुना नामतीन येणारा धन्यवादित असो स्वर्गलोकी "होसान्ना." 10 तो
यरूशलेममा येवावर पुरा शहरमा च्यावच्याव व्हईनी अनी त्या बोलणात हाऊ कोण?
11 लोकसनी गर्दी बोलणी, गालील प्रांतना नासरेथ गावतीन येल, हाऊ "येशु"
संदेष्टा शे. 12 नंतर येशु मंदिरमा गया; मंदिरमा ज्या खरेदी-विक्री करी राहींतात त्या
सर्वासले त्यानी बाहेर हाकली दिधं. सोनारसना चौरंग अनी कबुतर ईकनारासना
बैठकी त्यानी पालथ्या कऱ्यात. 13 अनी त्यासले सांगं, "मना घरले प्रार्थना मंदिर
म्हणतीन," अस शास्त्रमा लिखेल शे; पण तुम्हीन त्याले "लुटारूसनी गुहा" करी
राहीनात. 14 मंग आंधया अनी लंगडा मंदिरमा त्यानाकडे वनात, त्यानी त्यासले
बरं करं. 15 तवय त्यानी करेल चमत्कार अनी दावीदना पोऱ्याले "होसान्ना"
असा मंदिरमा गजर करनारा धाकला पोऱ्यासले दखीन मुख्य याजक अनं शास्त्री
संतापनात, 16 अनं त्याले बोलणात, ह्या काय म्हणी राहिनात हाई तुम्हीन ऐकं का?
येशुनी त्यासले सांगं, हो; "धाकला अनं दुधपेता लेकरंसना तोंडघाई तु स्तुती करी
लेयल शे; हाई तुम्हीन शास्त्रमा वाचं नही का?" 17 नंतर तो त्यासले सोडीन शहरना
बाहेर बेथानीले गया, अनं तठेच रातले मुक्काम राहिना. 18 मंग सकायमा येशु
परत नगरमा ई राहिंता तवय येशुले भूक लागणी. 19 अनी वाटवर एक अंजिरनं
झाड दखीसन तो त्यानाकडे गया; पण पानटासशिवाय त्यानावर त्याले काहीच
भेटनं नही; मंग तो झाडले बोलना, यानापुढे तुले कधी फळ न येवो; अनी ते

अंजिरनं झाड लगेच वाळी गयं. **(aiōn g165)** **20** हाई दखीन शिष्यसले आश्चर्य
वाटनं, अनं त्या बोलणात, अंजिरनं झाड लगेच कश काय वाळी गयं? **21** येशुनी
त्यासले उत्तर दिधं, मी तुमले सत्य सांगस, जर तुमनामा ईश्वास व्हई अनं मनमा
तुम्हीन शंका धरी नही, तर अंजिरना झाडले जस करं, तसं तुम्हीन करशात,
इतलंच नही, तर हाऊ डोंगरले तु उपटीसन समुद्रमा टाकाई जा, अस जर म्हणशात
तर ते व्हई जाई. **22** तुम्हीन प्रार्थनामा जे काही ईश्वास धरीन मांगशात ते सर्व
तुमले भेटी. **23** मंग तो मंदिरमा परत जाईसन शिकाडी राहिंता तवय मुख्य याजक
अनी वडील लोके त्यानाजोडे ईसन बोलणात, तुम्हीन हाई कोणता अधिकारतीन
करतस अनी तुमले हाऊ अधिकार कोणी दिधा? **24** येशुनी त्यासले उत्तर दिधं, मी
बी तुमले एक गोष्ट ईचारस, ती माले सांगशात तर कोणता अधिकारतीन मी हाई
करस ते मी तुमले सांगसु. **25** योहानना बाप्तिस्मा कोठेन व्हईना? स्वर्गकडतीन की
माणुसकडतीन? तवय त्या आपसमा ईचार करू लागणात की, स्वर्गकडतीन अस
म्हणं, तर हाऊ आपले म्हणी मंग तुम्हीन त्यानावर ईश्वास का ठेवतस नही? **26**
अनी जर माणुसकडतीन म्हणं तर आपले लोकसनी भिती वाटस कारण सर्वा लोके
योहानले संदेष्टा मानतस. **27** मंग त्यासनी येशुले उत्तर दिधं, आमले माहित नही,
तो त्यासले बोलना, तर कोणता अधिकारतीन मी हाई करस, हाई पण मी तुमले
सांगत नही. **28** बरं तुमले काय वाटस ते सांगा? एक माणुसले दोन पोऱ्या व्हतात;
तो पहिलाकडे जाईन बोलना, बेटा, आज द्राक्षमयामा जाईन काम कर; **29** त्यानी
उत्तर दिधं, मी नही जात; तरी त्याले थोडा येळमा पस्तावा वना अनी तो गया. **30**
मंग दुसराकडे जाईन त्यानी तसच सांगं; त्यानी उत्तर दिधं, हा मी जास; पण तो
गया नही. **31** ह्या दोन्हीसपैकी कोणी बापना ईच्छाप्रमाणे करा? त्या बोलणात,
पहिलानी, येशुनी त्यासले सांगं, मी तुमले सत्य सांगस की, जकातदार अनं वेश्या
तुमनापुढे देवना राज्यमा जातस. **32** कारण योहाननी तुमले देवराज्यना मार्ग दखाडा
अनं तुम्हीन त्याना ईश्वास करा नही; पण जकातदार अनं वेश्या यासनी त्यानावर
ईश्वास करा; हाई दखीसन सुध्दा तुम्हीन त्याना ईश्वास करा नही अनी पश्चाताप
बी करा नही. **33** आखो एक दृष्टांत ऐकी ल्या, एक माणुस व्हता, त्यानी द्राक्षमया
बनाडा, त्याना आजुबाजू वडांग करी, त्यामा द्राक्षरसकरता कुंडी बनाडी अनं
माळा बांधा अनी दुसरा शेतकरीले बटाईवर सोपीन परदेशले निंघी गया. **34** नंतर
फळसना हंगाम वना तवय त्यानी आपला उत्पन्नना वाटा लेवाकरता आपला

दाससले त्या शेतकरीकडे धाडं. 35 तवय शेतकरीनी त्याना काही दाससले धरीन
मारं, काही जणसले दगडमार करा अनं काही जणसले मारी टाका. 36 परत
त्यानी पहिलापेक्षा जास्त दाससले धाडं; त्यासनासंगे बी त्यासनी तसच करं. 37
शेवट त्या आपला पोऱ्याना तरी मान ठेवतीन म्हणीन त्यानी स्वतःना पोऱ्याले
त्यासनाकडे धाडं; 38 पण त्या शेतकरीसनी त्याले दखं अनं त्या एकमेकसले
बोलणात, हाऊ वारीस शे; चला आपण याले मारी टाकुत म्हणजे मळाना मालक
आपण व्हसुत. 39 तवय त्यासनी त्याले धरीन द्राक्षमयाना बाहेर काढीन मारी टाकं.
40 येशुनी त्यासले ईचारं, तर मंग द्राक्षमयाना मालक ई तवय तो त्या शेतकरीसनं
काय करी? 41 त्या त्याले बोलणात, तो त्या दुष्टसना हालहाल करीसन त्यासना
नाश करी अनी ज्या शेतकरी हंगाममा त्याले ईमानदारीमा उत्पन्न देतीन असासले
तो द्राक्षमया सोपी दि. 42 येशु त्यासले बोलणा, ज्या दगडले बांधणारासनी नापसंत
करा तोच कोणशीला व्हयना; हाई प्रभुकडतीन व्हयनं, अनं हाई आमना दृष्टीमा
आश्चर्यकारक कृत्य शे; अस पवित्र शास्त्रमा तुमना वाचामा वनं नही का? 43 यामुये
मी तुमले सत्य सांगस की, देवनं राज्य तुमनापाईन हिसकाई लेतीन; अनं जी प्रजा
त्यानं फळ दि, त्याच प्रजाले देवनं राज्य भेटी. 44 जो ह्या दगडवर पडी त्याना
चुराडा व्हई, पण ज्यानावर हाऊ दगड पडी त्याना भुगा-भूगा करी टाकी. 45 येशु
हाऊ दृष्टांत आपले लाईनं बोलना हाई मुख्य याजक अनं परूशीसना ध्यानमा वनं.
46 त्या त्याले धराले दखी राहींतात पण लोकसनी गर्दीनी त्यासले भिती वाटणी;
कारण त्या त्याले संदेष्टा मानेत.

22 येशु परत त्यासले दृष्टांत दिसन बोलना; 2 स्वर्गनं राज्य एक राजाना मायक
शे, त्यानी त्याना पोऱ्याना लगीननं जेवण दिधं; 3 अनी लगीनना जेवणकरता
ज्यासले निवतं देयल व्हतं त्यासले बलावाकरता त्यानी त्याना सेवकसले धाडं, पण
त्या ई नही राहींतात. 4 परत त्यानी दुसरा सेवकसले धाडीन सांगं, की, निमंत्रीत
लोकसले सांगा, दखा, मी जेवण तयार करेल शे, मना बोकड्या अनं कोंबड्या
कापाई जायेल शेतस, सर्व तयार शे, लगीनना जेवणले चला. 5 तरी हाई त्यासनी
मनवर नही लिधं अनी त्या काहीजण वावरमा, काहीजण व्यापारले निंघी गयात. 6
बाकीना निवतं मिळेल लोकसनी राजाना दाससले धरीन, त्यासना छळ करीसन
मारी टाकात. 7 तवय राजाले राग वना; अनी त्यानी आपला सैन्यले धाडीसन त्या
घातकीसना नाश करा अनी त्यासना शहर जाळी टाकं. 8 मंग तो आपला दाससले

बोलना, लगीननी तयारी व्हई जायेल शे, हाई खरं, पण आमंत्रित योग्य नव्हतात. **9**
म्हणीन तुम्हीन बाहेर रस्तासवर जा अनी जितला तुमले दखायतीन तितलासले
लगीनना जेवणकरता बलाई आणा. **10** मंग त्या दाससनी रस्तावर जाईन ज्या
बी त्यासले बरा वाईट भेटणात, त्या सर्वासले एकत्र करा अनी जेवाकरता येल
आमंत्रितसघाई लगीनघर भरी गयं. **11** राजा जेवणारासले दखाले वना, तवय तठे
लगीनना कपडा घालीन येल नही असा एक माणुस त्याले दखायना. **12** तवय तो
त्याले बोलना, दोस्त, तु लगीनना कपडा न घालता आठे कशा काय वना? त्यानी
काहीच उत्तर दिधं नही. **13** मंग राजानी सेवकसले सांगं, याना हात पाय बांधीन
याले अंधारमा टाका, तठे रडणं अनी दातखाणं चालस. **14** बलायेल बराच शेतस,
पण निवडेल थोडाच शेतस. **15** मंग परूशीसनी जाईन आपसमा चर्चा करी की,
येशुले त्यानाच बोलानामा कश फसाडानं **16** याकरता त्यासनी आपला शिष्यसले
हेरोदी पक्षना लोकससंगे त्यानाकडे धाडीन सांगं, गुरजी, आमले माहित शे की,
तुम्हीन खरा शेतस, देवना मार्ग खरापणतीन सांगतस, तुम्हीन मनुष्यसनं मत अनी
ईच्छासघाई प्रभावित होतस नही, कारण तुम्हीन लोकसनं तोंड दखीन बोलतस
नही. **17** तुमले काय वाटस हाई आमले सांगा, कैसरले कर देवाणा हाई योग्य शे
की नही? **18** येशु त्यासना मनमाधलं कपट वळखीन बोलना, अरे ढोंगीसवन का
बर मनी परिक्षा दखतस? **19** कर देतस ते नाणं दखाडा; तवय त्यासनी त्यानाजोडे
एक नाणं अनी दिधं. **20** त्यानी त्यासले ईचारं, यावर कोणं चित्र अनं लेख शे? **21**
त्या बोलनात, रोमना राजानं; येशुनी त्यासले सांगं, तर मंग राजानं शे, ते राजाले
अनी देवना शे, ते देवले भरी घा. **22** हाई ऐकीन त्यासले आश्चर्य वाटणं अनी त्या
त्याले सोडीन गयात. **23** त्याच दिनले, पुनरूत्थान व्हस नही, असा म्हणनारा
सदुकी पंथना लोकसनी त्यानाकडे ईसन ईचारं, **24** गुरजी, मोशेनी सांगेल शे
की, जर एखादा माणुस लेकरं-बाळ न व्हताच मरी गया तर त्याना भाऊनी त्याना
बायकोसंगे लगीन करीसन आपला भाऊना वंश चालावाना; **25** आमनामा सात
भाऊ व्हतात; त्यामधला पहिला लगीन करीसन मरी गया अनी त्याले लेकरं
नव्हतात म्हणीन त्यानी बायकोसंगे त्याना भाऊनी लगीन करं **26** तसाच दुसरा,
तिसरा, असा सातही जण तिनासंगे लगीन करीसन मरी गयात; **27** अनी सर्वासनंतर
ती बाई पण मरी गयी. **28** मंग जवय पुनरूत्थान व्हई तवय ती त्या सात जणसपैकी
कोणी बायको व्हई? कारण ती त्या सर्वासनी बायको व्हयेल व्हती. **29** येशुनी

त्यासले उत्तर दिधं; तुम्हीन शास्त्र अनी देवना सामर्थ्यले समजनात नही म्हणीन
तुम्हीन भ्रममा पडेल शेतस. **30** कारण पुनरूत्थान व्हवानंतर त्या लोके लगीन
करतस नही अनं करी बी देतस नही, तर त्या स्वर्गमधला देवदूतसना मायक
राहतस. **31** मरेलसना पुनरूत्थानबद्दल देवनी तुमले सांगं, ते तुमना वाचामा वना
नही का? **32** ते अस की, “मी अब्राहामना देव, इसहाकना देव अनं याकोबना देव
शे.” देव मरेलसना नही तर जिवतसना देव शे. **33** हाई ऐकीन लोकसनी गर्दीले
त्याना शिक्षणनं आश्चर्य वाटणं. **34** त्यानी सदुकी लोकसनं तोंड बंद करी टाकं
हाई ऐकीन परूशी लोके जमनात; **35** अनी त्यामातीन शास्त्रीसनी त्यानी परिक्षा
दखाकरता एक प्रश्न ईचारा; **36** गुरजी, नियमशास्त्रमा सर्वसमा मोठी आज्ञा कोणती
शे? **37** येशु त्याले बोलना, तु आपला देव परमेश्वर यानावर पुर्ण हृदयतीन, पुर्ण
जिवतीन अनं पुर्ण मनतीन प्रिती कर. **38** हाईच पहिली अनं मोठी आज्ञा शे. **39**
ईनामायकच आखो एक दुसरी आज्ञा अशी शे की, तु स्वतःवर करस तशी आपला
शेजारीसवर प्रिती कर. **40** ह्या दोन आज्ञासवरच सर्व नियमशास्त्र अनी संदेष्टासनं
शास्त्र ह्या अवलंबीन शेतस. **41** परूशी लोके एकत्र जमनात तवय येशुनी त्यासले
ईचारं; **42** ख्रिस्तबद्दल तुमले काय वाटस? तो कोणा पोऱ्या शे? त्यासनी त्याले
उत्तर दिधं, दावीदना पोऱ्या शे. **43** येशुनी त्यासले सांगं, तर मंग दावीदनी पवित्र
आत्माना प्रेरणातीन त्याले “प्रभु” अस कसं म्हणं? तो म्हणस, **44** परमेश्वरनी मना
प्रभुले सांगं, मी तुना शत्रुले तुना पायसनं आसन करस तोपावत तु मना उजवीकडे
बस. **45** दावीद जर त्याले प्रभु म्हणस तर तो दावीदना पोऱ्या कशा काय व्हई? **46**
तवय कोणलेच त्याले उत्तर देता वनं नही; अनी त्या दिनपाईन त्याले आखो काही
ईचारानी कोणीच हिम्मत व्हईनी नही.

**23** तवय येशु, लोकसनी गर्दीले अनी त्याना शिष्यसले बोलना, **2** शास्त्री अनं
परूशी या मोशेना आसनवर बठेल शेतस. **3** यामुये त्या जे काही तुमले सांगतीन ते
पाळा अनं तस वागा, पण त्या जश करतस तस करू नका; कारण त्या जे सांगतस ते
करतस नही, **4** त्या जड ओझं बांधीन लोकसना खांदावर टाकतस, पण त्या
स्वतः त्याले बोट बी लावतस नही; **5** अनी त्या आपला सर्वा कामे लोकसले
दखाडाकरता करतस, त्या आपला ताईत मोठा बनाडतस अनं आपला कपडासना
किनारले गोंडा लाईन आम्हीन भलता पवित्र शेतस असा दखाडतस. **6** पंगतमा
मुख्य स्थान अनं सभास्थानमा मुख्य आसन, **7** बजारमा लोकसकडतीन आदर

करी लेवाणं अनं स्वतःले गुरजी, अस म्हणी लेवाणं हाई त्यासले आवडस 8 तुम्हीन
स्वतःले लोकसकडतीन गुरजी म्हणी लेवु नका; कारण तुमना गुरू एक शे अनं
तुम्हीन सर्व भाऊ-भाऊ शेतस. 9 जगमा कोनले बी पिता म्हनान नही, कारण तुमना
पिता एकच शे अनं तो स्वर्गामा शे. 10 तसच तुम्हीन स्वतःले स्वामी म्हणी लेवु
नका कारण तुमना एकच स्वामी शे, तो म्हणजे ख्रिस्त शे. 11 तुमनामा जो मोठा शे
त्यानी तुमना सेवक व्हवाले पाहिजे. 12 जो कोणी स्वतःले मोठा माणुस समजी,
त्याले सर्वात खालना माणुस म्हणतीन, अनी जो कोणी स्वतःले लिन नम्र बनाडी
त्या माणुसले मोठा म्हणतीन. 13 अरे शास्त्री अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन,
तुमना धिक्कार असो! कारण लोकसनी मझार जावाले नको म्हणीन तुम्हीन स्वर्गना
राज्यनं दार बंद करतस; तुम्हीन स्वतःबी मझार जातस नही अनी मझार जाणारासले
बी जाऊ देतस नही. 14 अरे शास्त्री अनी परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना
धिक्कार असो! कारण तुम्हीन विधवासना घरसना नुकसान करी टाकतस अनं
दिखावाकरता मोठी प्रार्थना करतस, यामुये तुमले सर्वात जास्त भोग भोगना पडी.
15 अरे शास्त्रीसवन अनं परूशीसवन, अरे ढोंगीसवन, तुमना धिक्कार असो!
कारण तुम्हीन एक शिष्य बनाडाकरता जमीन अनं समुद्र पालथा घालतस अनी तो
भेटना तर तुम्हीन त्याले स्वतःपेक्षा दुप्पट नरकना भागीदार बनाडतस. (Geenna
g1067) 16 अरे वाट दखाडणारा आंधयासवन, तुमना धिक्कार असो! कारण
अस शे की, जसं एक शेतकरीनी वावरमा पेरणी करी. 27 अनी पिक येवाकरता
त्यानी काहीच करं नही फक्त रातले झोपे, सकायले ऊठे, पण इकडे वावरमा
पिक उगनं, ते कश उगनं, हाई त्याले समजणं नही. 28 जमीनमा आपोआप पिक
उगस, पहिले अंकुर मंग कणीस, मंग कंससमा दाणा भरावतस. 29 अस पिक
तयार व्हवानंतर कापणीनी येळ येस तवय शेतकरी ईळा लावस.'' 30 आखो
येशु बोलना, ''मी देवना राज्यले कसानी उपमा देऊ?'' ''कोणता दृष्टांत सांगीसन
त्यानं वर्णन करू? 31 देवनं राज्य हाई मोहरीना दाणाना मायक शे, जो जमीनमा
पेरणारा दानासमा पृथ्वीवरला सर्वात धाकला दाना र्‍हास. 32 तरी पण पेरा नंतर तो
जवय उगस तवय बाकीना रोपटास पेक्षा त्यान्या फांघा ईतल्या मोठ्या वाढतस की,
त्याना फांघावर सावलीमा पक्षीपण घरटा बांधीसन राहतस.'' 33 त्यासनी समजी
लेवानी क्षमता ध्यानमा लिसन त्यानी त्यासले बराच दृष्टांत सांगीन संदेश दिधा. 34
लोकससंगे जवय तो शिकाडे तवय तो दृष्टांत सांगीसनच शिकाडे, एकांतमा तो
त्याना शिष्यसले सर्व दृष्टांत समजाडीसन सांगे. 35 त्याच दिन संध्याकाय व्हवावर

येशुनी शिष्यसले सांगं, “आपण समुद्रना पलीकडे जाऊ.” **36** मंग लोकसले
सोडीन तो जी नाववर बशेल व्हता त्याच नावमा त्याना शिष्य त्याले संगे लई
गयात. त्यासनासंगे बाकिन्या नावपण व्हत्यात. **37** थोडा येळमा मोठं वादय सुरू
व्हयनं अनं मोठं-मोठल्या लाटा नाववर आदळाले लागनात. त्यामुये नावमा पाणी
भराले लागनं. **38** येशु नावना मांगला बाजुले उशीवर डोकं ठिन गाड झोपेल
व्हता, तवय शिष्यसनी त्याले ऊठाडं अनी त्या बोलनात, “गुरजी आपण सर्वाजन
मरी जासुत ह्यानी तुमले चिंता नही का?” **39** तवय येशु ऊभा राहिना, त्यानी
वादयले आज्ञा करी, “शांत व्हई जा!” अनी लाटासले तो बोलना, “थांबी जाय,”
तवय वादय बंद व्हई गयं अनी शांतता पसरी गयी. **40** येशुनी शिष्यसले ईचारं,
“तुम्हीन ईतला का बरं घाबरी जातस? तुमले अजुन बी ईश्वास नही का?” **41** मंग
शिष्य भलताच घाबरी गयात अनी एकमेकसले सांगु लागनात, “हाऊ शे तरी
कोण? वादय अनी लाटा या पण ह्यानी आज्ञा पाळतस!”

**5** मंग येशु अनी त्याना शिष्य गालील समुद्रना पलिकडला गरसेकरसना प्रदेशमा
वनात. **2** येशु नावमातीन उतरना, तवय एक दुष्ट आत्मा लागेल माणुस कब्रस्तान
माईन ईसन त्याले भेटना. **3** तो कब्रस्तानमाच राहे अनं साखळ्याघाई बांधीनसुध्दा
तो कोनाचघाई आवराये नही; **4** कारण त्याले बराचदाव बेड्यासघाई अनी
साखळ्याघाई बांध तरी तो साखळ्या तोडी टाके अनं बेड्यासना चुराडा करे, त्याले
आवरानी ताकद कोनामाच नव्हती. **5** तो रातदिन कब्रस्तानमा अनं डोंगरंसमा
वरडत फिरे, स्वतःले दगडसघाई ठेचीले. **6** जवय त्यानी येशुले दुरतीन दखं, तवय
तो पयत ईसन त्याना समोर पाया पडीन; **7** अनी जोरमा वरडीन बोलना, “हे येशु,
परमप्रधान देवना पोर्‍या! तुले मनाकडतीन काय तरास शे? मी तुले देवनी शपथ
घालस, तू माले शिक्षा देऊ नको!” **8** कारण येशु त्याले बोलना व्हता, “हे दुष्ट
आत्मा, ह्या माणुस माईन निंघी जाय!” **9** येशुनी त्याले ईचारं, “तुनं नाव काय
शे?” तो बोलना, “मनं नाव ‘सैन्य’ शे, कारण आम्हीन बराच शेतस!” **10** अनी
आमले ह्या प्रदेशमाईन काढु नको; अशा ईनंत्या दुष्ट आत्मासनी येशुले कर्‍यात. **11**
तठेच डोंगरजोडे डूकरंसना मोठा कळप चरी राहींता. **12** दुष्ट आत्मासनी त्याले
ईनंती करी की, “आमले त्या डुकरंसमा घुसू दे.” **13** त्यानी त्यासले परवानगी
दिधी. मंग त्या दुष्ट आत्मा त्या माणुस मातीन निंघीसन डुकरंसमा घुसनात अनी
त्या जवळपास दोन हजार डुकरे व्हतात. त्या पयत जाईसन कडावरतीन समुद्रमा

पडीसन मरनात. 14 मंग डुकरं चारनारासनी पयत जाईसन हाई बातमी गावमा अनं
वावरंसमा लोकसले सांगी. तवय काय व्हयनं हाई दखाकरता लोके तठे वनात. 15
तवय त्या येशु जोडे वनात, अनी त्यासनी ज्यानामा दुष्ट आत्मा व्हतात म्हणजेच
सैन्य व्हतं. त्याले शुध्दीवर येल अनं कपडा घालेल दखं, तवय त्यासले भिती
वाटनी. 16 ज्यासनी डोयासघाई दुष्ट आत्मा लागेल माणुसनी अनी डुकरंसनी
हकीकत दखेल व्हती ती त्यासले सांगी. 17 तवय त्या ईनंती करीसन येशुले सांगु
लागनात, तुम्हीन आमना प्रदेशमातीन निंघी जा. 18 मंग तो नावमा बसताच, बरा
व्हयेल माणुस त्याले ईनंती करीसन बोलना, "मालेपण तुमनासंगे लयी चला!" 19
पण त्यानी त्याले येऊ दिधं नही. तर त्याले सांगं, तु घर जाय, आपला लोकसले
सांगं, तुनावर दया करीसन प्रभुने तुनाकरता कितलं मोठं कार्य करेल शे. 20 मंग
दुष्ट आत्मा लागेल माणुसनी घडेल सर्व कार्य येशुनी जे त्यानाकरता करेल व्हतं, ते
तो सर्व दकापलीस म्हणजे दहा गावसना शहरमा जाईसन सांगाले लागना, तवय सर्व
लोकसले आश्चर्य वाटनं. 21 मंग येशु नावमा बशीसन परत पलीकडला काठवर
गया. तठे त्यानाजोडे लोकसनी मोठी गर्दी जमनी तवय तो समुद्रजोडेच व्हता. 22
याईर नावना एक सभास्थानना अधिकारी तठे वना अनं येशुले दखीसन त्याना पाया
पडना. 23 तवय तो येशुले कळकळ करीसन ईनंती करू लागना की, "मनी
धाकली पोर मराले टेकेल शे. ती वाचाले पाहिजे म्हणीसन तुम्हीन ईसन तिना
डोकावर हात ठेवा!" 24 मंग येशु त्यानासंगे जावाले निंघना तवय लोकसनी मोठी
गर्दी बी त्याना मांगे निंघनी. अनी त्यासनी त्याना आजुबाजू गर्दी करी. 25 ती
गर्दीमा एक बाई व्हती तिले बारा वरीस पाईन रक्तस्रावना आजार व्हता, 26
तिनाजोडे व्हतं नव्हतं तितलं सगळंच खर्चाई जायल व्हतं. तिले बराच तरास व्हता
म्हणीन तिनी वैघसकडतीन ईलाज करा तरी फरक पडना नही, उलटा आजार
जास्तीज वाढी जायेल व्हता. 27 ती येशु बद्दलन्या गोष्टी ऐकीसन त्या गर्दीमा
घुसनी अनी त्यानाकडे ईसन त्याना कपडासले हात लाया, 28 कारण ती सांगे,
"मी याना कपडासले जरी हात लावसु तरी बरी व्हसु." 29 तवय लगेच तिना
रक्तस्राव बंद व्हई गया अनं तिना शरिरले जानवणं मी या आजारपाईन मुक्त व्हई
जायल शे. 30 तवय येशुनी हाई लगेच वळखं की, आपलामातीन शक्ती निंघनी,
तवय त्यानी मांगे वळीन गर्दीमा ईचारं, "मना कपडासले कोणी हात लाया?"
31 पण त्याना शिष्य त्याले बोलनात, "लोकसनी गर्दी आपला आजुबाजूले शे

हाई तुम्हीन दखी राहीनात; तरी माले कोणी हात लाया, हाई कसं काय ईचारी
राहीनात?'' 32 तरी बी हाई कोणी करं, हाई दखाकरता येशुनी चारीबाजुले नजर
फिराई. 33 तवय ती बाई तिनासंगे जे काही घडेल व्हतं. तिनी ते वळखं अनी
घाबरीसन अनं थरथर कापत त्यानापुढे वनी अनी गुडघा टेकिन त्यानापुढे पडीसन
तिनी त्याले घडेल सर्वकाही खरंखरं सांगं. 34 येशु तिले बोलना, ''बाई, तुना
ईश्वासनी तुले बरं करेल शे. सुखरूप जाय, तुना आजारपाईन तु मुक्त शे.'' 35 येशु
हाई बोली राहींता ईतलामा तठे सभास्थानना अधिकारीना घरतीन काही लोकसनी
ईसन अधिकारीले सांगं की, ''तुमनी पोर मरी गई. आत्ते गुरजीले कशाले तरास
देतस.'' 36 तवय येशुनी त्यासनं बोलनं ऐकं, पण त्यासनाकडे ध्यान नही देता
तो सभास्थानना अधिकारीले बोलना, ''घाबरू नको, ईश्वास ठेव.'' 37 तवय
त्यानी पेत्र, याकोब, अनं याकोबना भाऊ योहान यासना शिवाय त्यानी आपलासंगे
कोणलेच येऊ दिधं नही. 38 अनी त्या अधिकारीना घरना जोडे येताच येशुनी
हंबरडा फोडीन रडणारासना अनं शोक करणारसना गोंधळ व्हयेल दखा. 39 तो
मजार जाईसन त्यासले बोलना, ''तुम्हीन कसाले रडतस अनी गोंधळ करतस? पोर
मरेल नही, झोपेल शे!'' 40 तवय त्यासनी त्यानी थट्टा करी, पण त्यानी त्या
सर्वासले बाहेर काढी दिधं अनी पोरना माय बापले अनी आपला तिन शिष्यसले
लिसन पोर व्हती त्या खोलीमा गया. 41 मंग त्या पोरना हात धरीसन तो बोलना,
''तलिथा कुम'' याना अर्थ, ''पोरी, मी तुले सांगस ऊठ!'' 42 ती बारा वरीसनी
पोर लगेच ऊठीसन चालाले लागनी त्या हाई दखीसन चमकाईनात. 43 हाई बात
कोणलेच सांगु नका अस येशुनी त्यासले बजाईन सांगं, अनी ''हिले काहीतरी
खावाले घा'' अस तो त्यासले बोलना.

**6** मंग येशु तठेन निंघीसन आपला नासरेथ गावले परत वना, अनं त्यानामांगे त्याना
शिष्य बी तठे वनात. 2 तो जवय शब्बाथ दिनले सभास्थानमा शिकाडी राहिंता
तवय तठला लोके त्यानं ऐकीन थक्क व्हईसन बोलनात की, ह्या सर्व गोष्टी ह्याले
कोठेन मिळण्यात? ह्याले काय हाई बुध्दी देवामा येल शे? अनी हाऊ चमत्कार
कशा करस? 3 अनं जो सुतार शे, अनी मरीयाना पोऱ्या अनी याकोब, योसेफ,
यहुदा, शिमोन, ह्यासना भाऊ तो हाऊच शे ना? त्यान्या बहिणी या आपलाबरोबर
शेतस ना? म्हणीन त्यासनी त्याले नकार. 4 येशु त्यासले बोलना, जो संदेष्टा ऱ्हास,
त्याले आपला घरमा, नातलगसमा अनं आपला गावमा मानपान भेटस नही पण

दुसरा लोके त्यासना सन्मान करतस. **5** त्यानी तठे थोडाच आजारीसले हात ठेईन
बरं करं, यानाशिवाय त्याले तठे कोणताच चमत्कार करता वना नही. **6** त्यासनी
येशुवर ईश्वास ठेया नही म्हणीन त्याले आश्चर्य वाटनं. तवय तो प्रचार करत गाव-
गाव फिरना. **7** मंग येशुनी बारा शिष्यसले बलाईसन त्यासले दुष्ट आत्मा काढाना
अधिकार दिधा अनी दोन दोन जणसनी जोडी करीसन त्यासले धाडी दिधं **8**
अनी त्यानी त्यासले आज्ञा करी की, "प्रवासकरता काठी शिवाय काहीच लई
जाऊ नका भाकर, झोळी अनं कमरबंदमा पैसा लई जाऊ नका. **9** तरी पायमा
जोडा घालीन चाला अनी संगे सदरा लेवु नका." **10** आखो तो त्यासले बोलना,
"ज्या घरमा तुमनं स्वागत करतीन त्याच घरमा गाव सोडा पावत ऱ्हावा. **11** अनी
ज्या गावना लोके तुमना स्विकार करावं नही अनी तठला कोणीच तुमनं ऐकाऊत
नही तवय तठेन निंघाना येळले तुमना पायनी धुळ तठेच झटकी टाका. कारण ती
त्यासले चेतावणी राही." **12** त्यासनी तठेन जाईसन लोकसले प्रचार करीसन सांगं,
"पाप सोडा अनी देवकडे वळा." **13** त्यासनी बराच दुष्ट आत्मा काढात अनी
बराच आजारीसले तेल लाईन बरं करं. **14** येशुबद्दल हेरोद राजानी ऐकं कारण
त्यानं नाव गाजेल व्हतं अनी काही लोके अस म्हणी राहींतात, "बाप्तिस्मा करनारा
योहान मरेल मातीन जिवत व्हयेल शे, म्हणीसन हाई चमत्कारनी शक्ती त्यानामा
कार्य करी राहीनी." **15** कोणी त्याले "एलिया" म्हणे तर कोणी म्हणेत संदेष्टा शे
म्हणजेच "जुना संदेष्टासना मायक एक शे." **16** पण हेरोद हाई ऐकीसन बोलना,
"हाऊ बाप्तिस्मा करनारा योहान शे! ज्याना मी शिरच्छेद करा, तो हाऊ योहान
जिवत व्हयेल शे!" **17** हेरोदनी माणसे धाडीसन योहानले पकडीन कैदखानामा
ठेयेल व्हतं. कारण त्याना भाऊ फिलीप्प यानी बायको हेरोदीया हिनासंगे हेरोद
राजानी लगीन करेल व्हतं. **18** अनी बाप्तिस्मा करनारा योहान हेरोदले सांगे, "तु
तुना भाऊनी बायकोसंगे लगीन करं, हाई अयोग्य शे." **19** यामुये हेरोदिया हाई
योहानना व्देष करे, तीनी त्याले मारानी ईच्छा व्हती पण हेरोदमुये तिले काहीच
करता वनं नही. **20** योहान हाऊ धार्मीक अनं पवित्र माणुस शे हाई हेरोदले माहित
व्हतं म्हणीन तो त्याले घाबरे अनं त्यानं रक्षण करे. तो जे काही बोले ते ऐकीसन
हेरोद गोंधळी जाये, पण तरी तो आनंदमा त्यानं ऐकी ले. **21** शेवट एक दिन
हेरोदिया हिले तिनी संधी भेटनी, कारण त्या दिन हेरोदना जन्मदिन व्हता. त्यानी
सरदार, प्रधान, अनं गालील प्रांतमाधला मोठा लोकसले जेवणनं निमंत्रण दिधं. **22**

मंग हेरोदिया हिना पोरनी स्वतः मजार राजवाडामा जाईसन नाचगाणा करीसन
हेरोदनासंगे जेवणले बसेल सर्वासले खूश करं, तवय राजा त्या पोरले बोलना,
“तुले जे काही पाहिजे ते मनाकडे मांग म्हणजे मी ते तुले दिसु.” 23 तो वचन
दिसन बोलना, “मी शपथ खाईसन सांगस की, मना अर्धा राज्य पावत जे काही
तु मांगशी ते मी तुले दिसु!” 24 तवय ती पोरनी बाहेर जाईसन आपली मायले
ईचारं, “मी काय मांगु?” तवय ती बोलनी, “बाप्तिस्मा करनारा योहाननं मुंडकं.”
25 मंग तिनी लगेच पयत जाईसन राजाले सांग, “बाप्तिस्मा करनारा योहाननं
मुंडकं ताटमा ठेईसन मनाकरता आत्तेच लई या अशी मनी ईच्छा शे!” 26 तवय
राजा भलताच नाराज व्हयना कारण त्यानी देयल शपथमुये अनी तठे जेवणले
बशेल लोकसनामुये त्याले तिले नकार देता वना नही. 27 तवय राजानी लगेच
शिपाईले कैदखानामा धाडीसन बाप्तिस्मा करनारा योहाननं मुंडकं लयानी आज्ञा
करी. तवय त्यानी कैदखानामा जाईन त्यानं मुंडकं कापं, 28 अनी मुंडकं ताटमा
ठेईसन त्या पोरले आणी दिधं अनी ती पोरनी ते आपली मायले दिधं. 29 जवय
बाप्तिस्मा करनारा योहानना शिष्यसले हाई बातमी कळनी तवय त्यासनी त्याना प्रेत
उचलीसन कबरमा ठेवं. 30 त्यानंतर प्रेषित येशुले परत ईसन भेटनात अनं त्यासनी
जे काही करेल व्हतं अनी शिकाडेल व्हतं ते सर्वकाही त्यासनी त्याले सांगं.
31 तठे भरपुर लोके ये जा करी राहींतात त्यामुये येशुले अनी त्याना शिष्यसले
जेवाले सवड भेटी नही राहींती. तवय तो त्यासले बोलना, “थोडा आराम कराले
एकांतमा चला.” 32 मंग त्या नावमा बशीन एकांतमा निंघी गयात. 33 तवय
लोकसनी त्यासले दखी लिधं बराच जणसनी त्यासले वळखी लिधं अनी तठला
गावमधला लोके पायी चालीसन अनं पयत जाईसन येशु अनी त्याना शिष्यसना
पहिलेच तठे पोहची गयात. 34 येशु नावमातीन उतरना तवय त्यानी लोकसनी
गर्दी दखी, तवय त्याले त्यासनी किव वनी कारण त्या बिगर मेंढपाळना भटकेल
मेंढरंसना मायक व्हई जायेल व्हतात. म्हणीन तो त्यासले बराच गोष्टी शिकाडु
लागना. 35 जवय बराच उशीर व्हयना तवय, शिष्य येशुकडे ईसन बोलनात,
“हाई एकांतनी जागा शे, अनी बराच उशीर व्हयेल शे. 36 म्हणीन त्यासले
जाऊ द्या म्हणजे लोके आसपासना खेडापाडा अनं गावमा जाईसन स्वतःकरता
जेवण ईकत लेतीन.” 37 पण येशुनी शिष्यसले उत्तर दिधं, “तुम्हीनच त्यासले
खावाले द्या,” तवय त्या बोलनात, “आम्हीन दोनशे चांदिना शिक्कासण्या भाकरी

ईकत लईसन त्यासले खावाले देऊत का?" **38** येशु त्यासले बोलना, "तुमना
जोडे कितल्या भाकरी शेतस? जाईसन दखा," त्या दखीसन बोलनात, "पाच
भाकरी अनी दोन मासा शेतस." **39** मंग येशुनी शिष्यसले सांगं अनी त्यासनी
सर्व लोकसले हिरवा गवतवर पंगतमा बसाले लायं. **40** तवय त्या शंभर शंभर
अनी पन्नास पन्नासन्या पंक्तीसमा बसनात. **41** तवय येशुनी त्या पाच भाकरी
अनी दोन मासा लिसन त्यावर स्वर्गकडे दखीसन आशिर्वाद मांगा, अनी भाकरी
मोडीसन शिष्यना जोडे त्यासले वाढाले दिध्यात अनी त्यानी त्या दोन मासा बी
सर्वासले वाढाले दिधात. **42** मंग सर्व लोकसनी पोटभर जेवण करं. **43** अनी
शिष्यसनी उरेल मासान्या अनं भाकरीसना बारा डालक्या भरीन उचल्यात. **44**
तठे जेवण खाणारा माणसेच फक्त पाच हजार व्हतात. **45** मंग येशुनी शिष्यसले
सांगं, "तुम्हीन नावमा बशीन समुद्रपलीकडला बेथसैदा गावमा जा, मी लोकसले
सोडीसन येस." **46** मंग तो लोकसले निरोप दिसन डोंगरवर प्रार्थना कराले गया.
**47** अनी संध्याकाय व्हयनी तवय येशु काठवर एकलाच व्हता अनी नाव समुद्रना
मध्यभागी व्हती. **48** तवय त्या त्याले नावमा आवकाया करतांना दखाईनात,
कारण वारा विरूध्द दिशाना व्हता; पहाटले तीन ते सव वाजाना दरम्यान तो समुद्रना
पाणीवरतीन चालीन त्यासनाजोडे वना. अनी त्यासना पुढे जावाना त्याना ईचार
व्हता, **49** पण त्या त्याले पाणीवरतीन चालतांना दखीसन घाबरी गयात अनी "हाई
भूत शे!" अस समजीन त्या वरडाले लागना. **50** कारण त्या सर्व त्याले दखीसन
घाबरी जायेल व्हतात. तवय येशु त्यासले बोलना, "धीर धरा, भिऊ नका, मी
शे!" **51** मंग तो त्यासनाजोडे नावमा गया, अनी वारा शांत व्हयना, तवय त्यासले
आश्चर्य वाटनं. **52** कारण त्या पाच हजार लोकसले जेवण खावाडानी गोष्ट त्यासले
समजेल नव्हती कारण त्यासनं मन कठोर व्हयेल व्हतं. **53** त्या समुद्रपलीकडला
गनेसरेत प्रांतमा किनारावर पोहचनात अनी तठे त्यासनी नाव बांधीसन ठेई. **54** त्या
नावमातीन उतरताच येशुले लोकसनी वळखं. **55** अनी त्या आसपासना परीसरमा
जठे कोठे माहीत पडनं, तो शे, तठे तठे त्या आजारी लोकसले खाटवर उचलीसन
पयत पयत लई जायेत. **56** तो गाव, शहर, खेडापाडामा जठे कोठे जाये तठे लोके
आजारीसले बजारमा लई जाईन ठि देत अनी तुना कपडाले हात लावु दे असा त्या
त्याले ईनंती करेत अनी जितलासनी त्याले हात लाया तितला बरा व्हई गयात.

**7** मंग परूशी अनं शास्त्री लोके यरूशलेमवरतीन ईसन येशुजोडे गोया व्हयनात. **2**
त्यासनी त्याना काही शिष्यसले अशुध्द हाततीन म्हणजे परूशीसना नियमना मायक
हात नहीं धोता जेवण करतांना दखेल व्हतं. **3** कारण परूशी अनी यहूदी लोके
पुर्वजसंना परंपरानुसार हात निट धवाशिवाय जेयेत नही. **4** त्या बाजार मातीन जे
लयेत ते धवाशिवाय खायेत नही. अनी जसं कटोरा, घडा, तांबाना भांडा घशेत अनं
धोयेत असा बराच नियम त्यासनी स्विकारेल व्हतात. **5** यावरतीन परूशीसनी अनी
शास्त्रीसनी येशुले ईचारं, "तुमना शिष्य अशुध्द हातघाई जेवतस, त्या पुर्वजसंना
रितीरिवाजाप्रमाणे का बरं नही चालतस?" **6** येशुनी उत्तर दिधं, "तुमना मायक
ढोंगीसबद्दल यशया संदेष्टानी चांगलाच संदेश देयल शे, तो असा शे की, या लोके
तोंडघाई मना सन्मान करतस पण त्यासनं मन मनापाईन दुर शे? **7** त्या स्वतःना
नियमसले देवना नियम बनाडीन शिकाडतस अनी वायफळ मनी भक्ती करतस."
**8** "तुम्हीन देवनी आज्ञा बाजुले करीसन माणससनी बनाडेल रितीरिवाजले चिटकी
राहतस." **9** आखो येशु त्यासले बोलना, "तुम्हीन आपला रितीरिवाज पाळाकरता
देवनी आज्ञा मोडाना चांगलाच मार्ग शोधी काढेल शे! **10** कारण मोशेनी अशी
आज्ञा देयेल शे की, 'आपला बाप अनी माय यासना मान राख,' अनी, 'जो कोणी
बाप किंवा मायनी निंदा करी त्याले मारी टाका.' **11** पण तुम्हीन म्हणतस जर
कोणी आपला माय बापले अस सांगतस की, मी तुमले मदत करतु पण जे मनाकडे
शे, 'ते मी देवले अर्पण कराले ठेयेल शे.' **12** तर त्याले आपला माय किंवा बापले
मदत नही करानं कारण भेटी जास. **13** तसच तुम्हीन आपला रितीरिवाज चालु
ठेवाकरता देवनं वचन मोडतसं अनी असा बऱ्याच गोष्टी करतस." **14** तवय
येशुनी परत लोकसनी गर्दीले बलाईन सांगं, "तुम्हीन सर्व, मनं ऐकी ल्या, अनं
समजी ल्या." **15** "अशी कोणतीच वस्तु नही जी बाहेरतीन माणुसमा जास अनी
त्याले अपवित्र करस, तर जे माणुस मातीन निंघस ते त्याले अशुध्द करस, **16**
ज्यासले कान शेतस त्यासनी निट ऐकी ल्या." **17** लोकसनी गर्दीले सोडीन जवय
येशु घर गया, तवय शिष्यसनी त्यानी सांगेल दृष्टांतना अर्थ ईचारा. **18** येशु त्यासले
बोलना, "तुम्हीन पण इतला आडानी शेतस का? जे काही बाहेरतीन माणुसमा जास
ते त्याले अशुध्द करू शकस नही हाई तुमले समजत नही का? **19** ते मनमा नही
जास तर ते पोटमा जास अनी ते शरिरमातीन बाहेर पडस." अस सांगीसन त्यानी
सर्व प्रकारनं अन्न शुध्द ठरावं. **20** आखो तो बोलना, "जे माणुस माईन निंघस तेच

माणुसले अशुध्द करस. 21 कारण मझारतीन म्हणजे माणुसना मनमातीन दुष्ट ईचार
निंघतस. अनैतीक कार्य, खुन, चोरी, 22 व्यभिचार, लोभ, दुष्टता, कपटपणा,
जळाऊपणा, चुगलीखोर, गर्विष्टपणा, मुर्खपणा. 23 ह्या सर्व वाईट गोष्टी माणुस
मातीन बाहेर निंघतस त्याच त्याले अशुध्द करतस." 24 मंग येशु तठेन ऊठीसन
सोर प्रांतना सिमावरला परीसरमा गया. तठे तो एक घरमा गया हाई कोणलेच
समजाले नको अस त्यानी ईच्छा व्हती, पण त्याले लपीन राहता वनं नही. 25
तवय एक बाईनी येशुबद्दल ऐकं, तिना धाकली पोरले दुष्ट आत्मा लागेल व्हता,
ती बाई लगेच ईसन त्याना पाया पडनी. 26 ती गैरयहूदी बाई व्हती, सिरियाना
फेनीके प्रांतमा तिना जन्म व्हयेल व्हता. तिनी येशुले ईनंती करीसन सांगं, मनी पोर
माधला दुष्ट आत्मा काढा. 27 तवय येशुनी उत्तर दिधं, "पहिले पोऱ्यासले तृप्त होऊ
दे. त्यासनं जेवण काढीसन कुत्रासले देनं बराबर नही शे." 28 तवय ती त्याले
बोलनी, हाई खरं शे, "गुरजी, तरी कुत्रा पण पोऱ्यासना हातमाईन मेजनाखाल
पडेल उष्ट खातस." 29 तवय येशुनी तिले सांगं, "तुनं बोलनं पटनं, शांतीमा जाय
तुना पोर मधला दुष्ट आत्मा निंघी गया!" 30 मंग ती घर गई; तिले दखायनं की,
पोर आंथरून वर निजेल शे अनं तिना मधला दुष्ट आत्मा निंघी जायेल शे. 31
तवय येशु सोर प्रांतमाईन निंघीसन सिदोनना रस्तावरतीन गालीलना समुद्रकडतीन
दकापलीस म्हणजे दहा गावसना शहरले वना. 32 तठे काही लोकसनी येशुकडे
एक मुका बहिरा माणुसले आनं अनी तुम्हीन त्यानावर हात ठेवा, अशी त्यासनी
त्याले ईनंती करी. 33 तवय येशु त्याले गर्दी माईन बाजुले लई गया त्याना कानमा
बोटे टाकात नंतर तो थुंकना अनी त्या थुंकीना त्याना जिभले स्पर्श करा. 34 अनं
येशु स्वर्गकडे दखीसन दम लाईन, त्या माणुसले बोलना, "इफ्फाता" म्हणजे
"मोकळा व्हय!" 35 तवय त्याना कान मोकळा व्हयना अनं त्यानी जिभनी गाठ
मोकळी व्हईन तो स्पष्ट बोलाले लागना. 36 तवय हाई कोणलेच सांगानं नही अस
येशुनी त्याले बजाईन सांगं पण त्यानी हाई गोष्ट सर्वासले सांगी दिधी. 37 तवय
ज्यासनी ऐकं त्या भलताच चकित व्हईसन बोलनात की, "हाऊ सर्वकाही कितलं
चांगलं करी लेस!" अनं "हाऊ बहिरासले ऐकानी अनं मुकासले बोलानी शक्ती
देस!"

**8** त्या दिनले लोकसनी मोठी गर्दी जमेल व्हती अनी त्यासनाकडे खावाकरता
काहीच नव्हतं, म्हणीन येशुनी आपला शिष्यसले बलाईसन त्यासले सांगं, 2

"माले या लोकसनी किव ई र्‌हायनी कारण त्या तीन दिनपाईन मनासंगे शेतस अनी
आते त्यासनाजोडे खावाकरता काहीच नही. 3 अनी जर मी त्यासले भूक्या तिश्या
घर जावाले लाई दिधं. तर त्या वाटमाच काल्या वाल्या करतीन कारण त्यासमा
बराचजन दूरतीन येल शेतस." 4 त्याना शिष्यसनी त्याले सांगं, "आठे ओसाड
प्रदेशमा ह्या पोटभर खातीन इतलं जेवण कोण लई ई?" 5 येशुनी त्यासले ईचारं,
"तुमना जोडे कितल्या भाकरी शेतस?" त्यासनी सांगं, "सात." 6 मंग येशुनी
लोकसले जमीनवर बसाले सांगं, त्या सात भाकरी लिसन देवना आभार मानात
अनी त्या मोडीसन शिष्यसना जोडे वाढाकरता दिध्यात अनी त्यासनी लोकसले
वाढ्यात. 7 त्यासनाजोडे काही धाकला मासापन व्हतात येशुनी त्यावर देवना
आभार मानीन त्या पण वाढाले सांगात. 8 सर्वासनी पोटभर जेवण करं अनी जे
उरनं त्याना सात टोपला भर्‌यात. 9 तठे जेवणकरता जवळजवळ चार हजार माणसे
व्हतात. मंग येशुनी त्यासले घर जावाले लायं. 10 अनी तो आपला शिष्यसंगे
नावमा बशीन दल्मनुथा प्रांतमा गया. 11 मंग परूशी तठे ईसन येशुसंगे वाद घालाले
लागनात अनी त्यानी परिक्षा दखाकरता त्यासनी त्याले सांगं, आकाशमा आमले
काहीतरी चमत्कार दखाड. 12 तवय त्याना आत्मा भलताच दुःखायना अनं येशु
बोलना, "हाई पिढीना लोके चमत्कार का बर मांगतस? मी तुमले खरंखरं सांगस
हाई पिढीना लोकसले कोणताच चमत्कार दखाडामा येवाव नही!" 13 तो त्यासले
सोडीसन परत नावमा बशीन समुद्रना पलीकडे गया. 14 नंतर शिष्य भाकरी लेवाले
ईसरी जायल व्हतात अनी नावमा त्यासनाजोडे फक्त एकच भाकर व्हती. 15 मंग
येशुनी त्यासले बजाईन सांगं की, "परूशी लोकसना अनी हेरोद राजाना खमीर
पाईन सावध रहा." 16 तवय त्या एकमेकसले बोलू लागनात, "आपलाजोडे
भाकरी नही शेतस म्हणीसन त्याले आपलाले हाई सांग." 17 येशुनी हाई वळखीन
त्यासले सांगं, तुमना जोडे भाकरी नही शेतस मंग चर्चा का बरं करतस? तुमले
अजुन समजनं नही का? अनी ध्यानमा बी नही वनं का? तुमनं मन कठोर व्हई
जायल शे का? 18 डोया राहिसन तुम्हीन दखंतस नही का? कान राहिसन तुम्हीन
ऐकतस नही का? तुमले याद नही का? 19 जवय मी पाच हजार लोकसले पाच
भाकरी मोडीसन दिध्यात तवय तुम्हीन जे उरेल व्हतं त्याना कितल्या डालक्या
उचल्यात? त्या बोलनात, बारा. 20 येशुनी ईचारं, "काय तुमले याद नही जवय
मी चार हजार लोकसकरता सात भाकरी मोडात तवय तुम्हीन कितला टोपला

भर्‍यात?" त्या बोलनात, "सात." 21 तवय त्यानी त्यासले ईचारं, "तुमले अजुन
नही समजनं का?" 22 मंग त्या बेथसैदा गावमा वनात तवय लोके येशुजोडे एक
आंधया माणुसले लई वनात अनी तुम्हीन याले स्पर्श करा अशी त्याले ईनंती कराले
लागनात. 23 तवय येशु त्या आंधया माणुसना हात धरीसन त्याले गावना बाहेर लई
गया अनी त्याना डोयाले थुंक लाईन त्यानावर हात ठेईन त्याले ईचारं, "तुले
काही दखाई राहीनं का?" 24 तवय तो वर दखीसन बोलना, "मी माणससले
दखु शकस पण त्या माले चालता फिरता झाडसना मायक दखाई राहिनात." 25
नंतर येशुनी त्याना डोयासवर परत हात ठेवात. तवय त्याना डोया उघडी गयात
अनी त्याले सर्व स्पष्ट दखावाले लागणं अनी तो बरा व्हयना. 26 मंग येशुनी
त्याले घर धाडतांना सांगं, "परत या गावमा जाऊ नको." 27 तवय येशु अनं
त्याना शिष्य फिलीप्पाना कैसरियाना गावसमा जावाले निंघनात. तवय त्यानी
शिष्यसले ईचारं, "लोके माले काय म्हणतस की, मी कोण शे?" 28 तवय त्यासनी
उत्तर दिधं, "काही लोके तुमले बाप्तिस्मा करनारा योहान, काहीजण तुमले एलिया
अनं काहीजण तुमले संदेष्टास माधला एक, अस म्हणतस." 29 त्यानी त्यासले
ईचारं, "पण तुमले काय वाटस मी कोण शे?" तवय पेत्रनी त्याले उत्तर दिधं,
"तुम्हीन तर तारणहार शेतस." 30 मंग येशुनी त्यासले बजाईन आज्ञा करी की,
"मनाबद्दल कोणलेच काही सांगु नका." 31 येशु शिष्यसले अस शिकाडू लागना
की; "मनुष्यना पोर्‍याले भलताच दुःख भोगना पडतीन, वडील लोके, मुख्य
याजक अनं शास्त्री लोके त्याले धिक्कारतीन, त्याले मारी टाकतीन, पण तीन दिन
नंतर तो परत जिवत व्हई." 32 हाई गोष्ट त्यानी उघडउघड सांगी दिधी, त्यामुये
पेत्र त्याले बाजूले लई गया अनी त्याले धमकाडीन बोलणा, अस नही व्हवु शकस.
33 तवय येशुनी शिष्यकडे वळीसन दखं अनं तो पेत्रले धमकाडीन बोलना, "अरे
सैतान, मना पुढतीन चालता व्हय," कारण "देवन्या गोष्टीसकडे तुनं ध्यान नही,
माणससना गोष्टीकडे शे!" 34 मंग येशुनी लोकसनी गर्दीसंगे शिष्यसले बी जोडे
बलाईन सांगं, "जर कोणले मनामांगे येवानी ईच्छा शे, तर त्याले आत्मत्याग
कराना अनी स्वतःना क्रुसखांब उचलीसन मनामांगे येवानं. 35 कारण जो कोणी
स्वतःना जीव वाचाडाले दखी, तो त्याले गमाडी; अनी जो कोणी मनाकरता अनं
वचनकरता जीव गमाडी तो त्याले वाचाडी. 36 माणुसले जगनं सर्व सुख भेटनं
अनी स्वतःना जीव गमाडा तर त्याले काय फायदा व्हई? 37 किंवा माणुस आपला

जीवना बदलामा काय देवु शकस? 38 ह्या पापी अनं व्यभिचारी पिढीमा ज्याले
मनी अनी मना वचननी लाज वाटी, मनुष्यना पोऱ्या, स्वर्गदेवदूतससंगे आपला
पिताना गौरवमा ई, तवय त्याले बी त्यानी लाज वाटी."

**9** येशुनी त्यासले सांगं, "मी तुमले सांगस की, ह्या येळले तुमनामा काहीजण असा
उभा शेतस ज्या देवनं राज्य मोठा सामर्थ्यमा येतांना दखाशिवाय त्यासले मरणना
अनुभव येवावुच नही." 2 मंग येशु सव दिन नंतर पेत्र, याकोब अनी योहान यासले
उंच डोंगरवर एकांतमा लई गया. अनी त्यासनासमोर येशुनं रूप बदलनं, 3 त्याना
कपडा धवळा व्हईसन ईतला चमकाले लागणात की, पुरी पृथ्वीवर असा एक
बी धोबी नही जो धोईसन ईतला धवळा कपडा करी. 4 तवय तिन्ही शिष्यसनी
दखं की एलिया अनी मोशे येशुसंगे बोली राहींतात. 5 तवय पेत्रनी येशुले सांगं,
"गुरजी, आपण आठे राहसुत तर कितलं भारी व्हई! आपण आठे तीन मंडप
बनाडुत, एक तुमनाकरता, एक मोशेकरता अनी एक एलियाकरता" 6 तो हाई
बोलानं म्हणीन बोली गया कारण त्याले समजी नही राहिंत की काय बोलु कारण
त्या सर्व घाबरी गयतात. 7 तवय ढग उतरनात त्यामा त्या झाकाई गयात अनी
ढगमातीन अशी वाणी व्हईनी की, "हाऊ मना प्रिय पोऱ्या शे, यानं तुम्हीन ऐका!"
8 मंग लगेच त्यासनी आजुबाजूले दखं पण त्यासले येशुनाशिवाय दुसरं कोणीच
दखायनं नही. 9 नंतर त्या डोंगरवरतीन उतरी राहींतात तवय येशुनी त्यासले आज्ञा
करी की, "तुम्हीन जे दखं ते मनुष्यना पोऱ्या मरानंतर परत जिवत व्हत नही
तोपावत कोणलेच सांगु नका." 10 हाई आज्ञा त्यासनी मान्य करी पण, "मरानंतर
परत जिवत व्हनं, याना अर्थ काय?" असा त्या एकमेकसले ईचारू लागनात. 11
मंग त्यासनी येशुले ईचारं, "एलिया पहिले येवाले पाहिजे अस शास्त्री का बर
म्हणतस?" 12 येशुनी त्यासले उत्तर दिधं, "पहिले एलिया ईसन सर्वकाही तयार
करी हाई खरं शे. पण तरी मनुष्यना पोऱ्याबद्दल अस का बर लिखेल शे की,
तो भलतं दुःख सहन करी अनी त्याले नाकारतीन? 13 मी तुमले सांगस की,
एलिया येल शे अनी त्यानाबद्दल जसं लिखेल शे, तसच लोकसनी त्यासले पटी
तसं त्यानासंगे करं." 14 नंतर त्या बाकीना शिष्यसजोडे वनात तवय त्यासना
आजुबाजू लोकसनी गर्दी शे अनी त्यासनासंगे शास्त्री लोक वाद करी राहिनात
अस त्यासनी दखं. 15 तवय येशुले दखताच सर्व लोके चकीत व्हयनात अनी
त्यानाकडे पयतच जाईसन त्याले नमस्कार करा. 16 मंग येशुनी त्याना शिष्यसले

ईचारं, “तुम्हीन त्यासनासंगे काय वाद करी राहींतात?” **17** गर्दीमातीन एकनी
उत्तर दिधं, “गुरजी, मना पोऱ्याले दुष्ट आत्मा लागेल शे, तो बोलु शकस नही,
म्हणीन मी त्याले तुमनाकडे लयेल शे. **18** जठे कोठे त्याले हाऊ दुष्ट आत्मा लागस
तठे तो त्याले धरीन उपटस, अनी याना तोंडमा फेस येस तवय हाऊ दातमिठ्या
खास अनं वातडा व्हस म्हणीन तो दुष्ट आत्मा काढाले मी तुमना शिष्यसले सांगं,
पण त्यासनाघाई तो निंघी नही राहीनं.” **19** येशुनी शिष्यसले उत्तर दिधं, “कितला
अईश्वासी लोके शेतस तुम्हीन! कोठपावत मी तुमनासंगे ऱ्हासु? कोठपावत तुमनं
सहन करू? त्या पोऱ्याले मनाकडे लई या!” **20** त्या त्याले येशुजोडे लई वनात.
तवय येशुले दखताच तो दुष्ट आत्मा त्या पोऱ्याले पिळाले लागना तसाच तो पोऱ्या
जमीनवर पडीन लोळाले लागना अनी त्याना तोंडमाईन फेस पण निंघाले लागना.
**21** तवय येशुनी त्याना बापले ईचारं, “कवयपाईन याले अस व्हई राहीनं?” त्यानी
उत्तर दिधं, “तो धाकला व्हता तवयपाईन अस व्हई ऱ्हायनं.” **22** “दुष्ट आत्मानी
याले मारा करता बराचदाव ईस्तवमा अनी बराचदाव पाणीमा टाकीन माराना प्रयत्न
करा. तुमले काय करता ई तर आमनावर दया करीसन मदत करा!” **23** येशु त्याले
बोलना, “हो, मी करू शकस! ईश्वास धरनारासकरता सर्वकाही शक्य शे.” **24**
तवय त्या पोऱ्याना बापना डोयामा पाणी वनं अनी तो वरडीन बोलना, “मी ईश्वास
धरस; पण मना ईश्वास भक्कम नही, मना ईश्वास वाढाले माले मदत कर!” **25**
त्या येळले येशुनी दखं की अजुन लोकसनी गर्दी ई राहिनी तवय त्यानी त्या दुष्ट
आत्माले धमकाडीन सांगं, “मुका बहिरा आत्मा यानातीन निंघ अनी मी तुले आज्ञा
देस परत फिरीन कधीच यानामा घुसू नको!” **26** तवय दुष्ट आत्मा वरडीन, त्या
पोऱ्याले पिळीन निंघी गया अनी तो पोऱ्या मरेलना मायक पडी ऱ्हायना हाई
दखीसन बराच लोक बोलू लागनात “हाऊ तर मरी गया!” **27** पण येशुनी त्याले
हाथ धरीन ऊठाडं अनी तो ऊठीसन उभा ऱ्हायना. **28** जवय येशु घरमा वना
तवय एकांतमा त्याना शिष्यसनी त्याले ईचारं, “आमनाघाई त्या पोऱ्यामाईन दुष्ट
आत्मा का बर नही निंघना?” **29** येशुनी त्यासले सांगं, “ह्या प्रकारना दुष्ट आत्मा
प्रार्थनाशिवाय दुसरा कसा घाईच निंघत नही.” **30** नंतर येशु अनी त्याना शिष्य
तठेन निंघीन गालीलमातीन जाई राहींतात. पण तो कोठे शे हाई कोणलेच माहित
पडाले नको अशी येशुनी ईच्छा व्हती, **31** कारण तो त्याना शिष्यसले शिकाडी
राहिंता; तो त्यासले बोलना की, “मनुष्यना पोऱ्याले मनुष्यसना हातमा सोपी देतीन;

त्या त्याले मारी टाकतीन अनी मारी टाकावर तीन दिन नंतर तो परत जिवत व्हई."
32 पण त्यासले येशुनी हाई गोष्ट समजनी नही अनी त्याना अर्थ काय शे, हाई त्याले
ईचारानी त्यासनी हिम्मत व्हई नही राहिंती. 33 मंग त्या कफर्णहुम गावले वनात;
अनी त्या घरमा व्हतात तवय येशुनी शिष्यसले ईचारं, "वाटमा तुम्हीन कोणती
बातवर चर्चा करी राहींतात?" 34 पण त्या गप्पच राहीनात, कारण सर्वात मोठा
कोण शे हाई बातवर त्या एकमेकससंगे वाटमा चर्चा करी राहींतात. 35 नंतर येशु
खाल बसना अनी त्यानी त्याना बारा शिष्यसले बलाईन सांगं, "ज्याले सर्वात मोठं
व्हवानी ईच्छा शे त्यानी सर्वात शेवट अनी सर्वासना सेवक बनीन ऱ्हावानं." 36
मंग त्यानी एक धाकला बाळले उचलीन त्यासना मझार त्याले ठेयं अनी त्याले
कवटाळीन त्यासले सांगं, 37 "जो कोणी मना नावतीन असा बाळसपैकी एकना
स्विकार करस तर तो माले स्विकारस, अनी जो कोणी मना स्विकार करस, तर तो
माले नही तर ज्यानी माले धाडेल शे त्याना स्विकार करस." 38 योहाननी येशुले
सांगं, "गुरजी, तुमना नावतीन एक माणुसले आम्हीन दुष्ट आत्मा काढतांना दखं,
तवय त्याले तु अस करानं नही अस आम्हीन त्याले सांगं, कारण तो आपलामाधला
नव्हता." 39 येशु त्यासले बोलना, "त्याले रोखु नका," कारण जो कोणी मना
नावतीन चमत्कार करी अनी लगेच मनी निंदा करी असा कोणी नही. 40 कारण
जो आपला विरोधमा नही तो आपला संगेनाच शे. 41 तुमले ख्रिस्तना लोके
समजीसन जो कोणी पेवाले प्याला भरीन पाणी दि तर मी तुमले खरंखरं सांगस की,
त्यानं प्रतिफळ त्याले भेटाशिवाय ऱ्हावाव नही. 42 जो कोणी मनावर ईश्वास
ठेवणारा या धाकलासपैकी एखादाले जरी पाप कराले बयजबरी करस, तर त्याना
गळामा जातानी मोठी तळी बांधीन त्याले समुद्रमा टाकानं ते त्यानाकरता चांगलं.
43 जर तुना हात तुले पाप कराले लावस, तर तो कापी टाक! दोन हात राहीसन
नरकमा म्हणजे वलवनार नही अशी आगमा जावापेक्षा एक हातना पांगया व्हईसन
स्वर्गमा प्रवेश करानं हाई तुनाकरता जास्त चांगलं शे. **(Geenna g1067)** 44 कारण
तठला किडा कधीच मरत नही अनी तठली आग कधीच वलावत नही. 45 तुना
पाय तुले पाप कराले लावस तर तो कापी टाक! दोन पाय राहीसन नरकमा म्हणजे
वलवनार नही अशी आगमा जावापेक्षा एक पायना लंगडा व्हईसन स्वर्गमा प्रवेश
करानं हाई तुनाकरता जास्त चांगलं शे. **(Geenna g1067)** 46 कारण तठला किडा
कधीच मरत नही अनी तठली आग कधीच वलावत नही. 47 तुना डोया जर तुले

पाप कराले लावस तर तो काढीसन फेकी दे! दोन डोया राहीसन नरकमा पडापेक्षा
एक डोयाना आंधया व्हईसन स्वर्गना राज्यमा प्रवेश करानं हाई तुनाकरता जास्त
चांगलं शे. **(Geenna g1067)** **48** “कारण तठला किडा कधीच मरत नही अनी
तठली आग कधीच वलावत नही.” **49** “प्रत्येकजनले आगघाई शुध्द कराई जाई
जसं बलिदान मीठघाई शुध्द करतस.” **50** “मीठ हाऊ चांगला पदार्थ शे; पण
मीठना खारटपणाच निंघी गया तर त्याले परत खारट कशा करशात? म्हणीन तुमनं
जिवन अस शुध्द ठेवा की, जसं मीठ कोणती बी वस्तुले शुध्द ठेवस, एकमेकससंगे
शांतीमा ऱ्हा.”

**10** मंग येशु तठेन निंघीसन यहूदीयाना प्रदेशमातीन यार्देन नदीना पलीकडे वना
अनी तठे लोकसनी गर्दी एकत्र व्हईन परत त्यानाकडे वनी, अनी त्यानी पध्दतमा
तो त्यासले शिकाडू लागना. **2** तवय काही परूशीसनी त्याले शब्दसमा पकडाकरता
तठे ईसन त्याले प्रश्न ईचारा की, “नवरानी बायकोले सुटपत्र देवानं, नियमप्रमाणे
हाई योग्य शे का?” **3** येशुनी त्यासले उत्तर दिधं की, “मोशेनी तुमले काय आज्ञा
देयल शे?” **4** त्या बोलणात, “नवरानी बायकोले सुटपत्र दिसन सोडानं, अशी
आज्ञा मोशेनी देयल शे.” **5** पण येशुनी त्यासले सांगं, “त्यानी हाई आज्ञा देवानं
कारण मी तुमले सांगस, तुमनं निर्दय मनमुये मोशेनी तुमले हाई आज्ञा दिधी, **6** पण
जसं वचनमा लिखेल शे, पृथ्वीनी निर्मिती पाईनच देवनी पुरूष अनी स्रीले बनाडं.
**7** या कारणमुयेच पुरूष त्याना माय बापले सोडिसन त्यानी बायकोसंगेच राही, **8**
पुढे त्या दोन नहीत तर एक शरीर शेतस. **9** यामुये देवनी जे जोडेल शे ते मनुष्यनी
तोडानं नही.” **10** त्या परत घर वनात तवय येशुना शिष्यसनी त्याच विषयबद्दल
परत ईचारं. **11** तवय येशुनी त्यासले सांगं, “जो कोणी आपली बायकोले सुटपत्र
दिसन दुसरीसंगे लगीन करस तर तो आपली बायकोसंगे व्यभिचार करस. **12** अनी
जर बायको आपला पहिला नवराले सुटपत्र दिसन दुसरासंगे लगीन करस तर
ती तिना आपला नवरासंगे व्यभिचार करस.” **13** येशुनी पोऱ्यासले आशिर्वाद
देवाले पाहिजे म्हणीन काही लोके आपला पोऱ्यासले येशुकडे लई वनात पण
शिष्यसनी त्यासले दताडं. **14** ते दखीसन येशुले भलतं वाईट वाटनं अनी तो
शिष्यसले बोलना, “धाकलासले मनाजवळ येऊ घा त्यासले मना करू नका,
कारण देवनं राज्य धाकलासना मायकच शे. **15** मी तुमले सत्य सांगस, जो कोणी
धाकलासना मायक व्हईसन देवना राज्यना स्विकार कराव नही त्याना त्यामा

प्रवेश व्हवाव नही.”  **16** तवय त्यानी धाकलासले कवटाळीन अनी त्यासवर हात
ठेईन त्यासले आशिर्वाद दिधा.  **17** मंग येशु निंघीन वाटले लागना इतलामा एक
पोऱ्या पयत वना अनी त्यानापुढे गुडघा टेकीसन त्याले ईचारू लागना, “चांगला
गुरजी, सार्वकालिक जिवन मिळाकरता मी काय करू?” **(aiōnios g166)**  **18**
येशुनी त्याले सांगं, “माले चांगला का बरं म्हणस? देवना शिवाय कोणीच चांगला
नही.  **19** तुले तर देवन्या आज्ञा माहित शेतस; ‘मनुष्यहत्या करू नको, व्यभिचार
करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, फसाडु नको,’ ‘आपला बाप
अनी माय यासना मान राख.’”  **20** त्यानी उत्तर दिधं, “गुरजी, मी तरूणपणपाईन
या सर्व आज्ञा पाळेल शेतस.”  **21** येशुना मनमा त्यानाबद्दल प्रेम निर्माण व्हयनं
त्यानी त्यानाकडे दखीन सांगं, “तुनामा एक कमी शे. जा, तुनं सर्वकाही ईकी
टाक अनी येल पैसा गरीबसमा वाटी दे म्हणजे तुले स्वर्गमा धन भेटी; अनी मंग
मनामांगे ये.”  **22** पण हाई ऐकीसन त्यानं तोंड उतरी गयं अनी तो नाराज व्हईन
निंघी गया कारण तो भलता श्रीमंत व्हता.  **23** तवय येशुनी चारीबाजु दखीसन
आपला शिष्यसले सांगं, “श्रीमंतसले देवना राज्यमा प्रवेश करनं कितलं कठीण
शे!”  **24** हाई ऐकीसन शिष्यसले आश्चर्य वाटणं, येशुनी त्यासले परत सांगं, “मना
पोऱ्यासवन, देवना राज्यमा प्रवेश करनं कितलं कठीण शे!  **25** श्रीमंत माणुसले
देवना राज्यमा प्रवेश करानं यानापेक्षा उंटले सुईना नाकमातीन जाणं सोपं शे.”  **26**
शिष्य भलताच आश्चर्यचकीत व्हयनात अनी ईचारू लागनात, “तर मंग तारण
व्हई तरी कोणं?”  **27** येशुनी त्यासनाकडे दखीन सांगं, “मनुष्यकरता हाई अशक्य
शे, पण देवकरता नही; कारण देवले सर्वकाही शक्य शे.”  **28** पेत्र त्याले बोलना,
“तुमना शिष्य व्हवाकरता आम्हीन आमनं बठं काही सोडी देयल शे.”  **29** यावर
येशुनी उत्तर दिधं, “मी तुमले खरंखरं सांगस की, ज्यानी मनाकरता अनी सुवार्ता
प्रचार करता घरदार, भाऊ, बहिणी, माय, बाप, पोऱ्या किंवा वावरसले सोडी देयल
शे.  **30** त्याले घर, भाऊ, बहिणी, माय, बाप, पोऱ्या अनी वावर या सर्व गोष्टी
याच जिवनमा शंभरपटमा भेटी. यानासंगेच त्याले मनाकरता छळ बी सोसना
पडी पण येणारा युगमा त्याले सार्वकालिक जिवन भेटी. **(aiōn g165, aiōnios
g166)**  **31** पण तरी बराच जणससंगे अस व्हई की, ज्या पहिला शेतस त्या शेवटला
व्हतीन अनी ज्या शेवटला शेतस त्या पहिला व्हतीन.”  **32** मंग येशु अनी त्याना
शिष्य यरूशलेमले जाई राहींतात, अनी येशु शिष्यसना पुढे चाली राहिंता, त्या

घाबरेल व्हतात; अनी ज्या मांगे चाली राहींतात त्यासना मनमा भिती भराई जायेल
व्हती. तवय परत येशुनी बारा शिष्यसले जोडे बलाईन जे त्यानासंगे घडाव शे, ते.
33 त्यासले तो सांगु लागना, "दखा, आपण यरूशलेममले जाई राहिनुत मनुष्यना
पोर्‍याले प्रमुख याजक अनी शास्त्री ह्यासले सोपी देतीन. त्या त्याले मरणदंडकरता
दोषी ठराईसन गैरयहूदीसना हवाले करतीन, 34 त्या त्यानी थट्टा करतीन, त्यानावर
थुंकतीन, त्याले फटका मारतीन अनं त्याले मारी टाकतीन; अनी तीन दिनमा
तो परत जिवत व्हई." 35 जब्दीना पोर्‍या याकोब अनी योहान येशुजोडे ईसन
बोलणात, "गुरजी, जे काही आम्हीन तुमनाकडे मांगसूत ते तुम्हीन आमनाकरता
करा अशी आमनी ईच्छा शे." 36 येशुनी त्यासले ईचारं, "मी तुमनाकरता काय
करू अशी तुमनी ईच्छा शे?" 37 त्या बोलणात, "जवय तु तुना वैभवशाली
राज्यमा राजासनवर बसशी तवय एकले तुना उजवी बाजुले अनी एकले तुना डावी
बाजुले बसाड अशी आमनी ईच्छा शे." 38 येशुनी त्यासले सांगं, "तुम्हीन काय
मांगी राहिनात हाईच तुमले समजी नही राहीनं. जो दुःखना प्याला मी पेवाव शे तो
तुमले पिता ई का? जो मृत्युना बाप्तिस्मा मी लेणार शे तो तुमनाघाई लेवावणार
काय?" 39 त्या बोलणात, "लेता ई." येशुनी त्यासले सांगं, "जो प्याला मी पेवाव
शे तो तुम्हीन पिशात अनी जो बाप्तिस्मा मी लेणार शे तो तुम्हीन लेशात हाई खरं;
40 पण मना डावा अनी मना उजवा बाजुले बसाडानं, हाऊ अधिकार माले नही.
हाई जागा त्यासनाच करता शे ज्यासनाकरता देवनी ती तयार करी ठेयल शे." 41
याकोब अनी योहान यासनी येशुजोडे काय मांग हाई जवय बाकीना दहा शिष्यसले
समजनं तवय त्यासले भलता राग वना. 42 येशुनी त्यासले बलाईसन सांगं,
"गैरयहूदी ज्यासले अधिकारी मानतस, त्यासनाच त्यासनावर अधिकार चालस,
अनी त्यासनाच मोठा लोके त्यासनावर राज्य करतस हाई तुमले माहित शे. 43 पण
तुमनामा तसं नही, तर ज्याले तुमनामा महान व्हणं शे त्यानी पहिले सर्वासना सेवक
व्हवाले पाहिजे. 44 अनी ज्याले तुमनामा पहिला व्हवानी ईच्छा शे त्यानी पहिले
सर्वासना दास व्हवाले पाहिजे 45 कारण मनुष्यना पोर्‍या पण सेवा करी लेवाले नही
तर सेवा कराले अनी लोकसना पापनं मोल म्हणीन आपला जीव देवाले येल शे."
46 नंतर त्या यरीहो शहरमा वनात, येशु, त्याना शिष्य अनी लोकसनी मोठी गर्दी,
हाई यरीहोतीन बाहेर जाई राहींती तीच वाटवर तीमयाना पोर्‍या बार्तीमय हाऊ
आंधया भिकारी बशेल व्हता. 47 तवय हाऊ नासरेथ गावना येशु शे, हाई ऐकीन तो

वरडीन बोलना, “हे येशु, दावीदना पोऱ्या, मनावर दया कर!” 48 तवय त्याले
बराच जणसनी धमकाडीन सांगं, गप्प ऱ्हाय. पण तो जास्तच वरडाले लागणा, “हे
दावीदना पोऱ्या, मनावर दया कर!” 49 तवय येशुनी थांबीसन सांगं, “त्याले
बलावा” मंग त्यासनी आंधयाले बलाईन सांगं, “हिम्मत धर ऊठ, येशु तुले बलाई
ऱ्हायना.” 50 तवय तो पांघरेल कपडा बाजुले फेकीसन, उडी मारीन ऊठना अनी
लगेच येशुकडे वना. 51 येशुनी त्याले ईचारं, “मी तुनाकरता काय करू अशी तुनी
ईच्छा शे?” आंधया त्याले बोलना, “गुरजी, मनी ईच्छा शे माले परत दखता
यावं.” 52 येशुनी त्याले सांगं, जा, “तुना ईश्वासनी तुले बरं करेल शे.” अस
बोलताच त्याले दखावु लागनं अनी तो वाट धरीन येशुना मांगे चालु लागना.

**11** यरूशलेम जवळना बेथफगे अनी बेथानी या गावजवळना जैतुनना डोंगरवर
त्या वनात, तवय येशुनी आपला शिष्यसमातीन दोन जणसले समजाडीन धाडं की,
2 समोरना गावमा जा, तठे जाताच ज्यावर कधीच कोणी माणुस बशेल नही अस
गधडानं एक शिंगरू बांधेल दखाई ते सोडीसन आणा. 3 तुम्हीन अस का बरं
करी राहिनात, अस जर कोणी ईचारं तर सांगा, प्रभुले यानी गरज शे अनी तो
लगेच याले परत धाडी दी. 4 तवय त्या गावमा गयात तठे वाटवर एक घरना
दारसमोर गधडानं पिल्लु त्यासले बांधेल दखायनं. त्या त्याले सोडाले लागनात. 5
तवय तठे ज्या उभा व्हतात त्यासनी त्यासले ईचारं, “काय करी राहीनात? तुम्हीन
गधडानं पिल्लुले का बर सोडी राहिनात?” 6 जसं येशुनी त्यासले सांगेल व्हतं
तसं त्यासनी उत्तर दिधं, मंग त्यासनी त्यासले ते गधडानं पिल्लु लई जाऊ दिधं.
7 नंतर त्या गधडाना शिंगरूले येशुजोडे लयनात अनं त्यानावर आपला कपडा
टाकात अनी त्यानावर येशु बसना. 8 मंग बराच लोकसनी आपआपला कपडा
वाटवर पसारात, बाकिनासनी वावरमातीन खजुरन्या झाडन्या फांघा आणीन वाटवर
पसाऱ्यात. 9 अनी त्यानापुढे अनं मांगे चालणार गजर करीसन बोली राहींतात,
“देवनी स्तुती व्हवो! प्रभुना नावतीन येणारा धन्यवादित असो! 10 आमना बाप
दावीद राजा, ह्यानं येणारं राज्य धन्यवादित असो! देवनी स्तुती व्हवो!” 11 नंतर तो
यरूशलेममा वना अनी मंदिरमा गया, तो मंदिरना चारीबाजु दखी राहिंता. दखता
दखता संध्याकाय व्हयनी मंग तो बारा शिष्यससंगे बेथानीले निंघी गया. 12 दुसरा
दिन त्या बेथानीतीन निंघनात तवय येशुले भूक लागणी. 13 तवय पानटासनी भरेल
अंजिरनं झाड त्यानी दुरतीन दखं अनी त्यावर काही अंजिर भेटतीन म्हणीन तो

त्यानाजोडे गया. पण त्याले फळच नव्हतं, कारण अंजिरना हंगाम येल नव्हता. 14
तवय येशुनी अंजिरना झाडले सांगं, “यानापुढे कधीच कोणी तुनं फळ खावाव
नही!” अनी हाई त्याना शिष्यसनी ऐकं. (aiōn g165) 15 मंग त्या यरूशलेममा
वनात, अनी येशु मंदिरमा जाईसन तठे व्यापार करनारासले बाहेर हाकलु लागना.
अनी पैसा अदल बदल करनारासना चौरंग उलथा पालथा करी टाकात, त्यासले
अनी कबुतर ईकनारासले बाहेर काढी टाक. 16 अनी मंदिर आंगनमातीन विक्रीना
मालले ने आण करानीसुध्दा त्यानी मनाई करी. 17 तो त्यासले उपदेश करू
लागणा, “मना घरले सर्व राष्ट्रमाधला लोकसनं प्रार्थनास्थान म्हणतीन,” असं देवनी
सांगेल शास्त्रमा लिखेल शे, पण “तुम्हीन त्याले लुटारूसनी गुहा करी टाकेल शे!”
18 हाई मुख्य याजक अनी शास्त्रीसनी ऐकं अनी येशुले मारानं कसं यानी योजना
आखाले लागनात. कारण त्या त्याले घाबरी राहींतात, यामुये की सर्व लोके त्याना
शिक्षणवरतीन थक्क व्हई जायेल व्हतात. 19 मंग संध्याकायले येशु अनी त्याना
शिष्य रोजप्रमाणे नगरना बाहेर गयात. 20 मंग पहाटले तिच वाटतीन जातांना
त्यासनी ते अंजिरनं झाड मुळपाईन सुकी जायल व्हतं अस दखं. 21 तवय पेत्रले
आठवण वनी तो येशुले बोलना, “गुरजी, दखा, तुम्हीन ज्या अंजिरना झाडले शाप
देयल व्हता ते सुकाई जायल शे.” 22 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “देववर ईश्वास
ठेवा. 23 मी तुमले सत्य सांगस, जो कोणी हाऊ डोंगरले, तु उपटीसन समुद्रमा
टाकाई जा, अस म्हनी अनी आपला मनमा शंका नही धरता मी म्हणसु ते व्हई
जाई असा ईश्वास धरी तर ते व्हई जाई. 24 यामुये मी तुमले सांगस, जे काही
तुम्हीन प्रार्थना करीसन मांगशात ते तुमले भेटेलच शे असा ईश्वास धरा म्हणजे ते
तुमले भेटी जाई. 25 जवय तुम्हीन उभा राहिसन प्रार्थना करतस तवय तुमना
मनमा कोणाबद्दल काही राग व्हई तर त्याले माफ करा; यानाकरता की तुमना
स्वर्गीय पिता परमेश्वर तुमना अपराधसनी क्षमा कराले पाहिजे. 26 पण तुम्हीन जर
क्षमा कराव नही तर तुमना स्वर्ग माधला बाप पण तुमना अपराधसनी क्षमा करावु
नही.” 27 मंग त्या परत यरूशलेमले वनात, अनी येशु मंदिरमा फिरी राहिंता तवय
त्यानाकडे मुख्य याजक, शास्त्री, अनी वडील लोके ईसन त्याले बोलणात, 28
“तुम्हीन हाई काम कोणता अधिकारतीन करतस अनी हाई कराना अधिकार तुमले
कोणी दिधा?” 29 येशुनी त्यासले उत्तर दिधं, “मी बी तुमले एक प्रश्न ईचारस,
माले उत्तर घा, म्हणजे कोणता अधिकारतीन मी हाई करस ते तुमले सांगसु. 30

योहानले बाप्तिस्मा देवाणा अधिकार देवकडतीन व्हता की, माणुसकडतीन व्हता?
यानं माले उत्तर द्या." 31 तवय त्या एकमेकसले ईचारू लागणात देवकडतीन व्हता
अस जर म्हणं तर हाऊ म्हणी अस व्हतं मंग तुम्हीन योहानवर का बर ईश्वास
ठेवा नही? 32 माणुसकडतीन व्हता अस जर म्हणं तर सर्व लोके आपलाविरूध्द
ऊठतीन यानी भिती त्यासले वाटनी कारण योहान खरच संदेष्टा व्हता असा सर्व
मानेत. 33 तवय त्यासनी येशुले उत्तर दिधं, "आमले माहीत नही." येशुनी त्यासले
सांगं, "मंग मी पण तुमले सांगत नही कोणता अधिकारतीन मी हाई करस."

**12** मंग येशु दृष्टांत दिसन त्यासनासंगे बोलु लागणा, एक माणुसनी द्राक्षमया
बनाडा, त्याना आजुबाजू वडांग करी, द्राक्षरसकरता कुंडी बनाडी, ध्यान देवाले
माळा बांधा अनी दुसरा शेतकरीसले बटाईवर सोपीन परदेशले निंघी गया. 2 मंग
द्राक्षना हंगाममा वाटा लेवाले त्यानी आपला दासले त्या शेतकरीसकडे धाडं. 3
त्याले त्यासनी धरीन मारं अनी रिकामं धाडी दिधं. 4 त्यानी परत दुसरा दासले
धाडं; त्यासनी त्यानं डोकं फोडीसन त्याना अपमान करा. 5 मालकनी आखो
एकजणले धाडं, त्यासनी त्याले मारी टाकं; अनी नंतरना बराच जणससंगे तसच
करं, म्हणजे त्यामाईन बाकीनासले मारं अनी बाकीनासना जीव लिधा. 6 अजुन
त्यानाजोडे एकजण राहेल व्हता. तो म्हणजे त्यानाच प्रिय पोऱ्या, आपला पोऱ्याना
तरी त्या मान ठेवतीन अस म्हणीन शेवट त्याले त्यानी त्यासनाकडे धाडं. 7 त्याले
येतांना दखीसन त्या एकमेकसले बोलणात, हाऊ तर वारीस शे. चला आपण ह्याले
मारी टाकुत म्हणजे मळाना मालक आपणच व्हई जासूत. 8 मंग त्यासनी त्याले
धरीन मारी टाकं अनी द्राक्षमयाना बाहेर फेकी दिधं. 9 मंग द्राक्षमयाना मालक
काय करी? तो ईसन त्या शेतकरीसना नाश करी टाकी अनं द्राक्षमया दुसराले दि.
10 काय तुम्हीन शास्त्रमा हाई वचन वाचं नही का? "ज्या दगडले बांधणारासनी
नापसंत करं तोच दगड कोणशीला व्हयना." 11 हाई प्रभुकडतीन व्हयनं; अनी
हाई आमना नजरमा आश्चर्यकारक कृत्य शे! 12 येशु हाऊ दृष्टांत आपले लाईन
बोलना हाई त्यासना ध्यानमा वनं. तवय शास्त्री त्याले धराले दखी राहींतात पण
लोकसनी गर्दीनी त्यासले भिती वाटनी त्यामुये त्या त्याले सोडीन निंघी गयात. 13
नंतर त्यानाच बोलनामा त्याले फसाडा करता त्यासनी परूशी अनी हेरोदी पक्षना
पुढारीसले येशुकडे धाडं. 14 त्या ईसन त्याले बोलणात, गुरजी, आमले माहित
शे तुम्हीन खरा शेतस, तुम्हीन मनुष्यसना मत अनी ईच्छासघाई प्रभावित होतस

नही, तुम्हीन लोकसनं तोंड दखीन बोलतस नही तर देवना खरा मार्ग शिकाडतस
पण आमले सांगा रोमना राजाले कर देवानं हाई आमना नियमप्रमाणे योग्य शे का
अयोग्य शे? आम्हीन देवानं का नही देवानं? 15 त्यानी त्यासनं ढोंग वळखीन
त्यासले सांगं, "का बर मनी परिक्षा दखी राहीनात? माले एक नाणं दखाडा."
16 त्यासनी ते दखाडं तवय त्यानी त्यासले सांगं, "यावर कोण चित्र अनी लेख
शे?" त्या बोलणात, रोमना राजानं. 17 येशुनी त्यासले सांगं, तर जे राजानं शे ते
राजाले द्या अनी जे देवनं शे ते देवले द्या. येशुनं उत्तर ऐकीन त्या आश्चर्यचकीत
व्हयनात. 18 मंग पुनरूत्थान व्हस नही असा म्हनणारा सदुकी लोके येशुकडे वनात
अनी त्याले ईचारं, 19 "गुरजी, मोशेनी आमनाकरता अस लिखी ठेल शे की,
'एखादाना भाऊ मरना' अनी त्यानी बायको बिगर लेकरंसनी शे, तर त्याना भाऊनी
तिनासंगे लगीन करीसन भाऊना वंश चालावाना." 20 एक ठिकाणे सात भाऊ
व्हतात; त्यासनामा मोठानी लगीन करं अनी तो लेकरं नही व्हताच मरी गया.
21 मंग दुसरा भाऊनी तिनासंगे लगीन करं अनी तो बी संतती नही व्हताच मरी
गया. तिसरा बी तसाच मरना 22 तसाच सातही जण संतती नही व्हताच मरी
गयात. सर्वासना शेवट ती बाई बी मरी गई. 23 तर पुनरूत्थान व्हई तवय ती कोणी
बायको व्हई? कारण ती साती जणसनी बायको व्हयेल व्हती. 24 येशुनी त्यासले
उत्तर दिधं, "तुम्हीन शास्त्र अनी देवनं सामर्थ्यले वळखेल नही म्हणीन तुम्हीन
चुकतस ना? 25 कारण त्या मरणमातीन ऊठानंतर लगीन करतस नही अनी करी
बी देतस नही, तर त्या स्वर्गमधला देवदूतसना मायक राहतस." 26 मरेल ऊठाडाई
जातस यानाबद्दल मोशेना पुस्तकमाधला जळता झुडूपना प्रकरणमा देवनी त्याले
सांगं, "मी अब्राहामना देव, इसहाकना देव अनी याकोबना देव शे," हाई तुमना
वाचामा वनं नही का? 27 तो मरेलसना देव नही तर जिवतसना देव शे; तुम्हीन
पुराच चुकेल शेतस. 28 तवय शास्त्रीसमाधला एकजणनी ईसन त्यासना वादविवाद
ऐका, अनी येशुनी सदुकीसले कसं सुंदर पध्दतमा उत्तर दिधं हाई दखीन, त्यानी
त्याले ईचारं, "सर्वात मोठी आज्ञा कोणती?" 29 येशुनी उत्तर दिधं, "मोठी आज्ञा
हाई की, हे इस्राएलना लोकसवन! ऐका, प्रभु आपला देव एकमेव देव शे. 30 तु
आपला देव परमेश्वर यानावर पुर्ण मनतीन, पुर्ण जिवतीन, पुर्ण बुध्दीतीन अनं
पुर्ण शक्तितीन प्रिती कर." 31 दुसरी हाई की "जशी स्वतःवर तशी आपला
शेजारीसवर प्रिती कर." या दोन्ही आज्ञापेक्षा दुसरी कोणतीच मोठी आज्ञा नही.

32 तो त्याले बोलना, "गुरजी, तुम्हीन खरोखर बोलणात की, 'तो एकच देव शे
अनी त्यानाशिवाय दुसरा कोणीच नही.' 33 अनी 'पुर्ण मनतीन, पुर्ण बुध्दितीन
अनी पुर्ण शक्तितीन त्यानावर प्रिती करानी अनी जशी स्वतःवर तशी शेजारीसवर
प्रिती करानी' हाई सर्व 'होम अनं यज्ञ' यानापेक्षा मोठं शे." 34 त्यानी समजदारीमा
उत्तर दिधं हाई दखीसन येशुनी त्याले सांगं, "तु देवना राज्यपाईन दुर नही."
त्यानानंतर त्याले आखो काही ईचारानी कोणीच हिम्मत व्हयनी नही. 35 नंतर
येशुनी मंदिरमा शिक्षण देतांना सांगं, "ख्रिस्त दावीदना वंशज शे हाई शास्त्री कसं
काय म्हणतस?" 36 "कारण दावीद स्वतः पवित्र आत्माना प्रेरणातीन म्हणस; प्रभु
परमेश्वरनी मना प्रभुले सांगं; तु मना उजवीकडे बैस, जोपावत मी तुना शत्रुसले तुना
पायसनं आसन करस नही." 37 दावीद स्वतः त्याले प्रभु म्हणस, मंग ख्रिस्त
त्याना वंशज शे हाई कसं काय? हाई येशुनं बोलणं लोकसमुदाय आनंदमा ऐकी
राहिंता. 38 येशु लोकसले शिकाडतांना बोलणा, "शास्त्रीसपाईन जपी ऱ्हा, त्यासले
लांब झगा घालीन फिराले, बजारमा लोकसकडतीन नमस्कार करी लेवाले, 39
अनी सभास्थानमा मुख्य आसन अनी मेजवानीमा चांगली जागा ह्या त्यासले
आवडतस. 40 ह्याच त्या शेतस ज्या विधवासनी संपत्ती फसाडीन खाई टाकतस
अनी दिखावाकरता लांबलांब प्रार्थना करतस. सर्वात जास्त त्यासले शिक्षा व्हई!"
41 येशु मंदिरमधला दानपेटी समोर बशीन लोक दानपेटीमा पैसा कशा टाकतस हाई
तो दखी राहिंता. बराच श्रीमंत लोकसनी बराच पैसा टाकात; 42 अनी एक गरीब
विधवानी ईसन दोन तांबाना नाणा टाकात त्यानी किंमत काहीच नव्हती. 43 तवय
येशुनी शिष्यसले जोडे बलाईन सांगं, "मी तुमले सत्य सांगस की, ज्या दानपेटीमा
टाकी राहिनात त्या सर्वासपेक्षा हाई गरीब विधवानी जास्त टाकेल शे. 44 कारण
त्या सर्वासनी त्यासना समृध्दीमातीन टाकात; पण हिनी तिना गरिबीमातीन जितलं
तिनं व्हतं तितलं म्हणजे सर्वी कमाई टाकी दिधी."

**13** मंग येशु मंदिरमातीन निंघीन जातांना त्याना एक शिष्य त्याले बोलना, "गुरजी
दखा, कशा ह्या मोठ्या दगडी अनी कशा ह्या माड्या!" 2 येशु त्याले बोलना
"तु ह्या मोठ्या माड्या दखस ना? ह्यासमा असा दगडवर दगड ऱ्हावाव नही; जो
पडाव नही." 3 येशु मंदिरसमोरला जैतुनना डोंगरवर बशेल व्हता तवय पेत्र,
याकोब, योहान अनं आंद्रिया यासनी एकांतमा त्याले ईचारं, 4 "ह्या गोष्टी कवय
व्हतीन? अनी ह्या गोष्टी पुर्ण व्हवानी येळ वनी म्हणजे काय चिन्ह दिसतीन?

हाई आमले सांग.”  5 येशु त्यासले बोलू लागना, “जपीन ऱ्हा, म्हणजे तुमले
कोणी फसाडाले नको.  6 बराच लोके मनं नाव लिसन येतीन, ‘मी ख्रिस्त शे!’
अनी त्या बराच जणसले फसाडतीन.  7 जवय तुम्हीन लढायासबद्दल ऐकशात
अनी लढायासन्या अफवा ऐकशात तवय घाबरू नका अस होणारच शे, पण
